दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –२५६ मंगळवर दि.२६ मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-256 Tuesday, Dt.26 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## लातूरमध्ये सीबीआयची धडक कारवाई

# पाचवा नामांकित डॉक्टर रडारवर, तासाभरापासून कसून चौकशी सुरू!

लातूर: देशभरात गाजलेल्या 'नीट' वैद्यकीय प्रवेश परीक्षा पेपर फुटी प्रकरणाचे धागेदोरे दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालले आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी गेल्या १० दिवसांपासून केंद्रीय अन्वेषण विभागाचे पथक लातूरमध्ये ठाण मांडून बसले आहे. सीबीआयच्या या पथकाकडून वेगवेगळ्या अंगाने कसून चौकशी सुरू असतानाच, आता लातूरमधील आणखी एक मोठी खळबळजनक माहिती समोर आली आहे. लातूरमधील पाचवा नामांकित डॉक्टर आता थेट सीबीआयच्या रडारवर आला असून त्याची कसून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

औसा रोड परिसरात सीबीआयची मोठी कारवाई

लातूर शहरातील अत्यंत उच्चभ्रू आणि मुख्य परिसर समजल्या जाणाऱ्या औसा रोड भागातील एका नामांकित आणि प्रथितयश डॉक्टरच्या हॉस्पिटलवर सीबीआयच्या पथकाने धडक दिली आहे. गेल्या एक तासाहून अधिक काळापासून सीबीआयचे अधिकारी या डॉक्टरची बंद दाराआड चौकशी करत आहेत.




नीट पेपर फुटी आणि गैरव्यवहार

प्रकरणाच्या या संपूर्ण रॅकेटमध्ये संबंधित डॉक्टरची नेमकी काय भूमिका होती? त्यांनी परीक्षार्थी किंवा दलालांना काही मदत केली होती का? पैशांची मोठी देवाणघेवाण या माध्यमातून झाली आहे का? या सर्व बाजू पडताळून पाहण्यासाठी सीबीआयच्या पथकाकडून सध्या कागदपत्रांची आणि संशयित व्यवहारांची कसून तपासणी सुरू आहे. या तपासातून वैद्यकीय क्षेत्रातील काही मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

लातूर शहरात प्रचंड खळबळ

आधीच चार जणांवर कारवाई झालेली असताना, आता थेट शहरातील एका मोठ्या आणि नामांकित डॉक्टरचे नाव या प्रकरणात समोर आल्याने आणि थेट सीबीआयने त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारल्याने लातूरच्या वैद्यकीय आणि शैक्षणिक वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणात पुढील काही तासांत सीबीआयकडून मोठा खुलासा होण्याची शक्यता आहे.

## धनादेशाच्या पाच प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

प्रकरणाची थोडक्यात हाकिकत आशिकी, प्रकरणातील फिर्यादी नामे मंगल दुधाळे व प्रीती दुधाळे यांनी आरोपी सुरेश नामदेव मोरे यांचे एस एम जी इंटरप्राईजेस या कंपनीत व्यवसायाकरिता दिनांक २९/०८/२०१२ रोजी नोटरी करून अनुक्रमे एक लाख वीस हजार व एक लाख पन्नास हजार रक्कम आरोपीस देऊन त्या बदल्यात प्रति महा ६०००/– व ४८००/– रुपये मोबदला बल्प विक्रीच्या व्यवसायातून देण्याचे कबूल करून करारनामा फिर्यादींच्या हक्कात करून दिला होता. परंतु



सदर करारनामाप्रमाणे आरोपीने फिर्यादींना करारात ठरल्याप्रमाणे फिर्यादींना प्रतिमाह ठरलेली रक्कम व मूळ रक्कम परत केले नाही म्हणून यातील फिर्यादी मंगल दुधाळे हिने या आरोपी सुरेश मोरे विरुद्ध त्याच्याकडे देय असलेली मूळ रक्कम बरोबर एक लाख वीस हजार व मोबदल्यापोटी देय असलेली रक्कम रुपये ७५६००/– व रक्कम १२००/– चे धनादेश आरोपीने फिर्यादीस दिले होते तसेच प्रीती दुधाळे हिस करारातील मूळ रक्कम एक लाख पन्नास हजार व मोबदल्याची रक्कम रुपये नऊ हजार सहाशे

पाच २ वर...

## माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार यांची उपस्थिती

### राहुल खंडागळे आणि सायेमा काझी यांचा उमेदवारी अर्ज दाखल



गेवराई : गेवराई नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ११ च्या पोटनिवडणूकी साठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने राहुल जिजा खंडागळे आणि काझी सायेमा आकेफ यांनी भाजपाचे नेते माजी मंत्री बदामराव पंडित आणि बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार ता. २५ रोजी सकाळी अकरा वाजता उमेदवारी अर्ज दाखल केले. सोमवारी सकाळी अकरा वाजता भाजपाचे नेते माजी मंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी नगरसेवक राहुल जिजा खंडागळे, सायेमा आकेफ काझी यांचा उमेदवारी अर्ज शक्ती प्रदर्शन करून, दाखल करण्यात आला आहे. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भगवती टॉकीज पासून पायी चालत रॅली काढून अर्ज दाखल केला.यावेळी युवानेते यशराज पंडीत,नगर परिषदेचे उपाध्यक्ष ड. भगवानराव घुंबार्डे,

पाच २ वर...

## ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मुंबईत 'वृक्षारोपण मोहिम' ; अभिनेत्री शिल्पा शेट्टीही उपस्थित

### हरित व प्रदूषणमुक्त मुंबईसाठी वृक्षारोपण मोहिमा महत्वाच्या

मुंबई /प्रतिनिधी

डी. वाय. पाटील इंटरनॅशनल स्कूल, वरळी आणि भामला फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज 'वृक्षारोपण मोहिमेचे' आयोजन करण्यात आले. या उपक्रमात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सहभागी होत विद्यार्थ्यांसोबत वृक्षारोपण केले.

या मोहिमेप्रसंगी जलसंपदा मंत्री जयकुमार रावल, मुंबईच्या महापौर रितू तावडे, प्रसिद्ध सिने अभिनेत्री शिल्पा शेट्टी, भामला फाउंडेशनचे अध्यक्ष असिफ भामला, सेहर भामला, शाळेचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व मोठ्या संख्येने पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.






शहर हिरवेगार ठेवण्यासाठी मोहिमा महत्त्वाच्या

वृक्षारोपणानंतर बोलताना मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या, वाढत्या शहरीकरणात आपल्या शहराला हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी अशा मोहिमा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एक झाड म्हणजे हजारो लोकांना ऑक्सिजन. डी. वाय. पाटील स्कूल आणि भामला फाउंडेशनने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या. याप्रसंगी

विद्यार्थ्यांना आवाहन करताना त्या म्हणाल्या,फक्त झाड लावून थांबू नका, तर त्याचे संगोपनही करा. प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड दत्तक घेऊन मोठे करावे. चला, आपण सर्वांनी मिळून अधिकाधिक झाडे लावूया आणि

पाच २ वर...

## मस्साजोग मध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

### दीड महिन्यात शेतकर्यांच्या विद्युत पंपासह वायरची दुसरी चोरी



अज्ञात चोरट्यांकडुन दोन विद्युत पंपासह सहा शेतकऱ्यांचे १२५० फूट वायर लंपास

मस्साजोग /प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग मध्ये चोरट्यांनी धुमाकूळ घालत पाझर तलावातील मागील एक ते दीड महिन्याखाली चाळीस ते पन्नास शेतकऱ्यांचे वायर चोरट्यांने चोरी करून नेल्याची घटनेला विसर पडत नाही.तोपर्यंत मस्साजोग मध्ये चोरीची दुसरी घटना समोर आली आहे.दोन शेतकर्यांच्या विद्युत पंपासह आणि वायर आणि चार ते पाच शेतकऱ्यांच्या मोटारीच्या वायरची अज्ञात चोरट्याने चोरी करून नेऊन दुष्काळात तेरावा झाल्याची घटना दि.२५ मे सोमवारी मध्यरात्री घडली आहे.ही चोरी झाल्याची घटना सकाळी शेतकऱ्यांच्या निदर्शनास आले आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून शेतकर्यामध्ये तणावाचे वातावरण निर्माण होऊन संतापाची लाट पसरली आहे आणि भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.या अज्ञात चोरट्यांचा माग काढून लवकरात लवकर चोरट्यांना जेरबंद करण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून योग्य उपाययोजना करण्याची मागणी मस्साजोग येथील शेतकर्यांनी केली आहे.या चोरी घटनेत सुदर्शन देशमुख, सुनील गायकवाड यांच्या पाच इंच एचपीचा पंप आणि अडीचशे फूट वायर चोरून नेले आहे तर मदन जिवनराव देशमुख यांचे दोनशे फूट वायर तर फुलचंद दिंगाबर देशमुख दोनशे फूट वायर, परमेश्वर सदाशिव देशमुख दोनशे फूट वायर , प्रवीण प्रकाश देशमुख दोनशे फूट वायर या सर्व शेतकऱ्यांचे तब्बल असे एकूण बाराशे पन्नास फूट वायर आणि दोन विद्युत पंपाची किंमत अंदाजे सुमारे एक लाख रूपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची माहिती शेतकरी सुदर्शन देशमुख यांनी दिली आहे.याघटनेने शेतकर्यामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## सर्व कर्मचाऱ्यांनी ई–केवायसी पुर्ण करावी–जिल्हा कोषागार अधिकारी

बीड /प्रतिनिधी

सर्व प्रशासकीय विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या अधिनस्त असलेल्या अधिकारी–कर्मचारी यांनी माहे मे–२०२६ देय जुन–२०२६ च्या वेतन देयकाअगोदर ई–केवायसी पूर्ण करुन घ्यावी. ही ई–केवायसी पूर्ण करण्याअगोदर बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करुन बँक खाते अद्यावत करण्यात यावे, तसेच सेवार्थ प्रणालीत नोंदविलेला पॅन क्रमांक चूकीचा असल्यास, नोंदविण्यात आलेला पॅन क्रमांकाची दुरुस्ती करुन अद्यावत करावा.




ई–केवायसी पूर्ण केल्यानंतर माहे मे–२०२६ देय जुन–२०२६ या महिन्याचे वेतन आहरीत करण्यात येतील, असे प्र. जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## लवूळमध्ये अवकाळी गारपिटीचा तडाखा



माजलगाव /प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे लवूळ येथे शुक्रवारी (दि. २३ मे) सायंकाळी अचानक अवकाळी गारांसह जोरदार पाऊस झाला. सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या दरम्यान सुरू झालेला हा गारांचा पाऊस तब्बल अर्धा तास कोसळल्याने परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

या अवकाळी गारपिटीमुळे आंबा बागांसह विविध पिकांना फटका बसला असून झाडावरील आंबे मोठ्या प्रमाणात गळून पडल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. तसेच इतर हंगामी पिकांचेही नुकसान झाले असून शेतकरी चिंतेत सापडले आहेत.अचानक झालेल्या या हवामान बदलामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## कर्मवीर एकनाथराव (जिजा) आवाड स्मृतिदिन

माजलगाव । प्रतिनिधी

मानवतेचा संदेश देत समाजातील वंचित, पीडित, उपेक्षित आणि गरजू घटकांसाठी आयुष्यभर कार्य करणारे कर्मवीर एकनाथराव (जिजा) आवाड यांच्या स्मृतिदिनानिमित्त सोमवार दि. २५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मानवी हक्क अभियान कार्यालय तेलगाव ता. धारूर, जि. बीड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मानवी हक्क अभियानाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. दादासाहेब शिरसागर राहणार असून उद्घाटक म्हणून मा. गयाबाई



एकनाथ आवाड उपस्थित राहणार आहेत. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. मच्छिंद्र गवळे मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमास मानवी हक्क अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. मिलिंद आवाड यांची विशेष उपस्थिती लाभणार असून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि विविध संघटनांतील पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या स्मृतिदिन कार्यक्रमातून कर्मवीर एकनाथराव (जिजा) आवाड यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यात येणार असून समाजातील न्याय, समानता आणि मानवतेचा संदेश अधिक दृढ करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. कार्यक्रमास परिसरातील नागरिक, कार्यकर्ते, युवक व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG



## संपादकीय....

# दहशतवाद ही आता वैश्विक समस्या

केवळ भारतच नव्हे, तर जगातील अनेक देश दहशतवादाच्या समस्येचा सामना करीत आहेत. डिजिटल युगात अफवा पसरवून किंवा जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात बसून दहशतवादी कारवाया करता येऊ शकतात. त्यामुळे दहशतवादाचा मुकाबला एकटादुकटा देश करू शकत नाही.

केवळ भारतच नव्हे, तर जगातील अनेक देश दहशतवादाच्या समस्येचा सामना करीत आहेत. डिजिटल युगात अफवा पसरवून किंवा जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात बसून दहशतवादी कारवाया करता येऊ शकतात. त्यामुळे दहशतवादाचा मुकाबला एकटादुकटा देश करू शकत नाही.

दहशतवाद व त्या माध्यमातून घडवली जाणारी हिंसा ही भारताकरिता जुनी डोकेदुखी आहे. भारताचे माजी पंतप्रधान राजीव यांची २१ मे १९९१ रोजी तमिळनाडूमधील श्रीपेरंबुदूर येथे निवडणूक प्रचारसभेदरम्यान झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता. त्या घटनेनंतर भारत सरकारने समाजात दहशतवाद आणि हिंसाचाराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ मे हा दिवस 'दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन' म्हणून घोषित केला. ऐंशीच्या दशकापासून देशात दहशतवादाने डोके वर काढले. खलिस्तानवादी चळवळीने पंजाबमध्ये अनेक निरपराध व्यक्तींची हत्या केली. काश्मीरमध्ये वेगवेगळ्या दहशतवादी संघटनांच्या माध्यमातून हिंसाचार घडवण्याची पाकिस्तानची खोड जुनीच आहे. श्रीलंकेतील एलटीटीईने राजीव गांधी यांची हत्या केली, तर खालिस्तानवादी दहशतवादातून इंदिरा गांधी यांना आपण गमावले.

मानवजातीच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता संघर्ष, युद्धे आणि हिंसा यांचे अनेक संदर्भ आढळतात. प्राचीन काळात भूभाग विस्तारासाठी युद्धे केली जात होती. मध्ययुगात धर्माच्या नावाखाली रक्तपात झाला. आधुनिक युगात राष्ट्रवाद, आर्थिक विषमता, राजकीय स्वार्थ, धार्मिक कट्टरता आणि जातीयवादामुळे हिंसाचाराला खतपाणी मिळाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जगाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेले असले, तरी मानवी मनातील द्वेष, सूडभावना आणि असहिष्णुता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. उलट आधुनिक तंत्रज्ञानामुळे दहशतवाद अधिक संघटित, आक्रमक आणि घातक बनला आहे. आज दहशतवादी संघटना इंटरनेट, सोशल मीडिया, आर्थिक नेटवर्क आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या मदतीने जगभरात भयाचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ एका देशापुरता मर्यादित प्रश्न राहिलेला नसून संपूर्ण मानवजातीसमोरील गंभीर आव्हान बनला आहे.

दहशतवाद म्हणजे राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा वैचारिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी हिंसा, भीतीचा वापर करणे होय. दहशतवादी संघटना समाजामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी निरपराध नागरिकांना लक्ष्य करतात. बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले, गोळीबार, अपहरण, रेल्वे किंवा विमानांवरील हल्ले, धार्मिक स्थळांवरील आक्रमणे आणि सायबर हल्ले अशा विविध मार्गांनी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात.

भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य मानले जाते. मात्र, काही विघातक शक्तींनी या विविधतेचा गैरफायदा घेऊन देशामध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**तहसीलदार व तालुका दंडाधिकारी कार्यालय,**
**ता. आंबेडकर जि. जालना**
**जा.क्र.२०२६/जामा-२/कवी-२६८**
**दिनांक-२०/०४/२०२६**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, मौजे शिरनेर यांना जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, श्री.देवराव परसराम वैराळ व श्री.युवराज परसराम वैराळ रा. शिरनेर ता. अंबड यांनी अर्ज करुन विनंती केली आहे की मौजे शिरनेर गट क्रमांक. १५९ मध्ये क्षेत्र ०.८० आर कलम १५५ नुसार दुरुस्ती आदेश मिळणे बाबत..

सबब प्रकरणात १५९ मध्ये क्षेत्र ०.८० आर कलम १५५ नुसार दुरुस्ती आदेश करण्यासाठी कोणाचाही आक्षेप असेल तर लेखी आक्षेप अर्जासह या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह हे जाहीर प्रगटन प्रशीध्दी झाल्याच्या दिनांका पासून ७ दिवसाच्या आत सादर करावे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार अंबड**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

## जाहिर प्रगटन

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार विठ्ठल शाहुराव उनवणे, रा.सुरळेगांव , ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांची मुलगी **ललिता शाहुराव उनवणे** यांचा जन्म दि.०२.०३.२००९ रोजी सुरळेगांव येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, सुरळेगांव ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे राहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय जन्म नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील जन्मधारकाचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, सुरळेगांव ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता जन्माबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-११९५ दि.   .   .२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **कमलाबाई बबन ससाणे, रा.ताडहादगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **पती**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १ | बबन बापुराव ससाणे | पती | ०९.११.२००३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१६१२ दि.२९.१२.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **विष्णू विठ्ठल वाकडे, रा.पिठोरी सिरसगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | भागीरथी विष्णु वाकडे | मुलगी | २८.१२.२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# पुरस्कारांचे शतकवीर समाजसेवक : भगवानराव शिनगिरे

## जिद्द,त्याग आणि समाजसेवेचा प्रेरणादायी प्रवास

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील वटनवाडी या छोट्याशा गावातून सामाजिक कार्य, शिक्षण, ग्रामविकास आणि लोकसेवेचा मोठा आदर्श निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे भगवानराव माणिकराव शिनगिरे होय. अथक परिश्रम, जिद्द, त्याग आणि समाजासाठी काहीतरी देण्याची तीव्र भावना याच्या जोरावर त्यांनी केवळ स्वतःचेच नव्हे, तर हजारो कुटुंबांचे आयुष्य उजळविण्याचे काम केले आहे. सामाजिक कार्यातील उल्लेखनीय योगदानामुळे राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तब्बल १३० हून अधिक पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले भगवानराव शिनगिरे हे आज पुरस्कारांचे शतकवीर म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याचा ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी घेतलेला आढावा.



वटनवाडीसारख्या ग्रामीण भागात एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन असामान्य कार्याचा इतिहास घडविणाऱ्या भगवानराव शिनगिरे यांचा जन्म ४ ऑगस्ट १९७० रोजी माणिकराव व साळुबाई शिनगिरे या कष्टकरी शेतकरी दाम्पत्याच्या पोटी झाला. लहानपणापासूनच प्रतिकूल परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि संघर्षमय जीवनाचा सामना करत त्यांनी समाजसेवेचे संस्कार आत्मसात केले. 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात' या उक्तीप्रमाणे त्यांच्या बालपणातच सामाजिक बांधिलकीचे बीजारोपण झाले होते.

भगवानराव शिनगिरे यांनी प्राथमिक शिक्षण वटनवाडी येथे चौथीपर्यंत पूर्ण केले. त्यानंतर कडा येथील जिल्हा परिषद शाळेत पुढील शिक्षण घेतले. मात्र घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे शिक्षणात खंड पडला. आर्थिक मर्यादा असूनही शिक्षणाची ओढ कायम ठेवत त्यांनी अनेक वर्षांनी पुन्हा शिक्षणाचा ध्यास घेतला आणि कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयातून बहिस्थ विद्यार्थी म्हणून बी.ए. पदवी संपादन केली. संघर्षातून उभा राहिलेला हा शैक्षणिक प्रवास अनेक युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

समाजसेवेची प्रबळ आवड असलेल्या भगवानराव शिनगिरे यांनी गावकऱ्यांच्या आग्रहास्तव राजकारणात प्रवेश केला. २००२ ते २०१२ या सलग दहा वर्षांच्या कालावधीत त्यांनी वटनवाडीचे सरपंच म्हणून कार्यभार सांभाळत गावाचा सर्वांगीण विकास साधला. त्यांच्या कार्यकाळात ग्रामविकास, स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक एकोप्याला प्राधान्य देण्यात आले. गावात विविध विकासकामे राबवून त्यांनी वटनवाडीला आदर्श गाव म्हणून ओळख मिळवून दिली.

त्यांच्या नेतृत्व आणि कार्यक्षमतेची दखल घेत आ. सुरेश धस यांनी त्यांना कडा कृषी उत्पन्न बाजार समितीवर संचालक म्हणून काम करण्याची संधी दिली. २००६ ते २०११ या कालावधीत त्यांनी संचालक म्हणून प्रभावी कामगिरी केली. विशेष म्हणजे, सेवा सहकारी संस्था मतदारसंघातून ते विक्रमी मताधिक्याने विजयी झाले होते.

शिक्षण आणि समाजपरिवर्तन हेच खरे राष्ट्रनिर्मितीचे माध्यम असल्याचा ठाम विश्वास बाळगून भगवानराव शिनगिरे यांनी १९९५ साली विवेकानंद सेवाभावी संस्थाची स्थापना केली. या संस्थेअंतर्गत प्राथमिक व माध्यमिक निवासी शाळेची स्थापना करण्यात आली. शासनाकडून कोणतेही अनुदान नसताना त्यांनी स्वतःची तब्बल दहा एकर जमीन विकून सुमारे एक कोटी रुपये खर्च करत शिक्षणसंस्था उभारली. हे कार्य त्यांच्या त्यागी आणि समाजाभिमुख वृत्तीचे जिवंत उदाहरण मानले जाते.

या निवासी शाळेमधून आजपर्यंत अनुसूचित जाती-जमाती, भटके विमुक्त, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अनाथ प्रवर्गातील सुमारे चार हजार विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. ग्रामीण भागातील दुर्लक्षित मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांनी हजारो कुटुंबांचे जीवन घडविण्याचे कार्य केले आहे.

ज्ञानाचा प्रसार व्हावा आणि गावातील तरुण पिढी वाचन संस्कृतीशी जोडली जावी, या उद्देशाने त्यांनी १९९९ साली वटनवाडी येथे विवेकानंद सार्वजनिक ग्रंथालय सुरू केले. यशवंत ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत २००४ साली या ब दर्जाच्या ग्रंथालयासाठी पाच लाख रुपये खर्चून सुसज्ज इमारत उभारण्यात आली. ग्रामीण भागात वाचनसंस्कृती रुजविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे सर्व स्तरांतून कौतुक झाले.

शेतकरी संघटन आणि सहकार क्षेत्रातही भगवानराव शिनगिरे यांनी मोठा ठसा उमटवला आहे. गावातील शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची स्थापना केली. शेतकऱ्यांचा त्यांच्यावर असलेल्या अढळ विश्वासामुळे गेले २५ वर्षे ते संस्थेचे अविरोध चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने उल्लेखनीय कामगिरी केली असून शंभर टक्के कर्जवसुली करणारी संस्था म्हणून सलग पाच वर्षे बीड जिल्ह्यात विशेष गौरव मिळविला आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते चेअरमन भगवानराव शिनगिरे आणि गटसचिव अरुण पडोळे यांचा सत्कार करण्यात आला आहे.

पुरस्कारांचे शतकवीर म्हणून ओळख

भगवानराव शिनगिरे यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याचा गौरव म्हणून २००५ ते २०२२ या कालावधीत त्यांना तब्बल १३० हून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील शतकवीर समाजसेवक म्हणून त्यांची विशेष ओळख निर्माण झाली आहे.

त्यांना मिळालेल्या महत्त्वाच्या पुरस्कारांमध्ये भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम राज्यस्तरीय पुरस्कार, नेल्सन मंडेला आंतरराष्ट्रीय पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय सन्मान, आंतरराष्ट्रीय नोबल पुरस्कार, गोल्डन स्टार पुरस्कार यांचा समावेश आहे. तसेच निर्मल ग्राम पुरस्कार, महात्मा गांधी तंटामुक्ती पुरस्कार, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता पुरस्कार, साने गुरुजी सुंदर शाळा पुरस्कार, सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी पुरस्कार आणि स्वच्छ दलित वस्ती पुरस्कार अशा अनेक सन्मानांनी त्यांच्या कार्याचा गौरव झाला आहे.

भगवानराव शिनगिरे यांच्या समाजसेवेच्या या कार्यात त्यांचे कुटुंबही खंबीरपणे सहभागी आहे. त्यांचे चिरंजीव गणेश शिनगिरे हे पदवीधर असून वटनवाडीचे पोलीस पाटील म्हणून कार्यरत आहेत. दुसरे चिरंजीव किरण शिनगिरे हे संगणक विषयात पदवीधर असून संस्थेच्या प्रशासकीय कामात सक्रिय योगदान देत आहेत. कन्या कु. हर्षदा शिनगिरे या डी.एड. व संगणक पदवीधर असून निवासी आश्रमशाळेत शिक्षिका म्हणून सेवा बजावत आहेत. संस्थेचे कामकाज दर्जेदार व सुरळीत राहावे यासाठी ही तिन्ही मुले मोलाचे योगदान देत आहेत.

महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांचा वारसा जपत, परोपकार, त्याग, शिक्षण आणि समाजउन्नतीचा ध्यास घेऊन कार्यरत असलेले भगवानराव माणिकराव शिनगिरे हे आजच्या पिढीसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत. एका सामान्य शेतकरी कुटुंबातील व्यक्तीने जिद्द, प्रामाणिकपणा आणि सेवाभावाच्या जोरावर समाजजीवनात उंच भरारी घेता येते, याचे ते जिवंत उदाहरण ठरले आहेत.

पान १ वरून...

**ना. पंकजाताई मुंडे यांच्या....**

त्यांचे संगोपन करून येणाऱ्या पिढीला सुरक्षित भविष्य देऊया, असे आवाहन मुंडे यांनी यावेळी केले.

देशी प्रजातींच्या विविध रोपांची लागवड

यावेळी पंकजाताई मुंडे व मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या आवारात आणि लगतच्या परिसरात वड, पिंपळ, कडुनिंब, करंज, बहावा अशा देशी प्रजातींच्या विविध रोपे लावण्यात आली. भामला फाउंडेशनतर्फे पुढील तीन वर्षे या झाडांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्यात आली आहे.

फोटो कॅप्शन : वरळी येथे डी. वाय. पाटील स्कूलमध्ये वृक्षारोपण करताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे. सोबत मंत्री जयकुमार रावल, महापौर रितू तावडे, अभिनेत्री शिल्पा शेट्टी, असिफ भामला व विद्यार्थी.

**माजी मंत्री बदामराव पंडित...**

नपचे गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी नगरसेवक एजाज भाई मेंबर, ज्येष्ठ पत्रकार अय्युब बागवान, सरपंच कैलासराव माने, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, ब्रम्हदेव धुरंधरे, बाळासाहेब सानप, राजू पठाण, माजेद भाई, नप सभापती शहेदाद भाई, बद्दुशेठ, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, मधुकर वादे,राजेश टाक,शिनुभाऊ बेद्रे, बबलु खराडे, नगरसेवक ज्ञानेश्वर भाले,माजी नगरसेवक भरत गायकवाड , लक्ष्मण चव्हाण,गणेश कानगुडे, बंडू निकम, शेख राजू, मतीन कुरेशी, बाबुभाई फिटर, यांच्यासह वार्डातील युवा मतदारांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती

**धनादेशाच्या पाच....**

रुपये धनादेश आरोपीने दिले होते सदर धनादेश त्यांनी त्यांच्या खात्यात वटणावळीस टाकले असता आरोपीच्या खात्यावर पुरेसे रक्कम नाही या कारणावरून ते परत आले त्यामुळे उपरोक्त फिर्यादींनी या आरोपीविरुद्ध एकूण पाच कलम १३८ निगोशियेबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट अन्वये माननीय अतिरिक्त मुख्य न्यायालय अधिकारी साहेब दुसरे बीड यांचे न्यायालयात दाखल केले होते नंबर ११९/२०१८ ,१२०/२०१८, १२१/२०१८, १२२/२०१८,१२३/२०१८. असे होते सदर प्रकरणांमध्ये फिर्यादी व साक्षीदार यांच्या माननीय न्यायालयात साक्षी नोंदवण्यात आल्या होत्या. आरोपीच्या वतीने घेतलेल्या बचाव व त्या बचावा प्रमाणे फिर्यादी व साक्षीदार यांचा घेतलेला भक्कम असा उलट तपास तसेच आरोपीच्या वतीने प्रकरणात दाखल केलेली इतर कागदपत्रे या सर्व बाजूंचा माननीय न्यायालयाने सूक्ष्मपणे अवलोकन करून व सदर प्रकरणात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आरोपीतर्फे घेण्यात आलेला बचाव खरा असल्याचे निष्पन्न झाल्याने माननीय अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकार साहेब दुसरे बीड यांनी आरोपी सुरेश नामदेवराव मोरे याची सदर एकूण पाचही प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली आहे. सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने केलेला युक्तिवाद व घेतलेला अभ्यास पूर्ण बचाव तसेच पुराव्यांचा विचार करतात माननीय न्यायालयाने आरोपीची सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता केली आहे सदरील प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. बाळासाहेब गायकवाड यांनी भक्कम बाजू मांडली व त्यांना सदर प्रकरणात ॲड. सागर नाईकवाडे, ॲड. शामसुंदर शिंदे, ॲड. विक्रांत पारगावकर, ॲड. सईद देशमुख, ॲड.लहू बागलाने, ॲड. त्रिंबक जाधव,ॲड. गणेश शिंदे एडवोकेट यांनी मोलाचे सहकार्य केले

# शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ :

# प्राचार्य डॉ.हरिदास विधाते सर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान नाही तर ते समाज परिवर्तनाचे अत्यंत प्रभावी अस्त्र आहे. विश्वामध्ये ज्या-ज्या वेळी शिक्षणाची क्रांती झाली, तेव्हा-तेव्हा प्रगतीची आणि परिवर्तनाची नवी पहाट उजाडली आहे. सर्वसामान्य, गोरगरीब, वंचित आणि ग्रामीण भागातील जनतेला याच शिक्षणाने स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि ऐक्याची दिशा दाखवली. छत्रपती शिवाजी महाराज, म. जोतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या महापुरुषांनी शिक्षणातूनच समाजाचा उद्धार केला. डॉ. आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे, शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि महाराष्ट्राच्या मातीत हा विचार खऱ्या अर्थाने रुजविण्याचे काम ज्या व्रतस्थ शिक्षकांनी केले, त्यात एक अग्रगण्य नाव म्हणजे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते सर.

सर्वसामान्य आणि ग्रामीण पार्श्वभूमीतून येत असताना, शिक्षणाची कास धरून त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने स्वतःची वाटचाल निश्चित केली. जिद्द, चिकाटी, प्रचंड आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमांच्या बळावर त्यांनी उच्च पदव्या संपादन केल्या. केवळ शैक्षणिक गुणवत्ता मिळवून ते थांबले नाहीत तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे सिनेट सदस्य, विद्या परिषद सदस्य, वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष



आणि व्यवस्थापन परिषद सदस्य अशा अत्यंत महत्त्वाच्या पदांवर त्यांनी यशस्वी आणि कार्यक्षम कारकीर्द घडवली. त्यांची ही वाटचाल म्हणजे त्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीची आणि अफाट बौद्धिक क्षमतेची साक्ष आहे.

हा सन्मान केवळ त्यांच्या पदाचा नाही तर त्यांच्यातील प्रचंड ध्येयवाद, सामाजिक बांधीलकी आणि विद्यार्थ्यांप्रती असलेल्या स्नेहभावाचा आहे. बीड जिल्ह्यासारख्या भागातील कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ अत्यंत प्रभावीपणे धुरा सांभाळली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा आणि ग्रामीण विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांच्या ठायी असलेला जिव्हाळा व आपुलकी यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण होतो. डॉ. विधाते सरांमुळे हजारो विद्यार्थी आज सक्षम बनून स्वावलंबी आणि सन्मानाचे जीवन जगत आहेत.

केवळ स्वतः काम न करता आपल्या सोबतच्या प्राध्यापक वर्गालाही त्यांनी एका सूत्रात बांधले आहे. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी तळमळीने आणि आपुलकीने काम करणाऱ्या सहकाऱ्यांची एक उत्कृष्ट फळी त्यांनी उभी केली. याच सामूहिक प्रयत्नांमुळे आज कडा येथील या महाविद्यालयाने गुणवत्तेच्या जोरावर विद्यापीठाच्या आणि महाराष्ट्राच्या नकाशावर आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे, ज्याचा सार्थ अभिमान संपूर्ण कडावासीयांना आहे. आनंद चॅरिटेबल संस्था आणि शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक आणि माजी आ. आदरणीय भीमराव धोंडे यांच्या दूरदृष्टीच्या मार्गदर्शनाखाली, प्राचार्य डॉ. विधाते यांनी संस्थेचे मोठे हित साधले आहे. राष्ट्रपुरुषांच्या विचारांचा वारसा जपत गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या कुटुंबाला शिक्षणाचा आधार मिळवून देत तरुणांना सशक्त करण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले आहे. त्यांच्या या निस्वार्थ आणि समर्पित सेवेची दखल घेत त्यांना आतापर्यंत अनेक राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील आदर्श पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या राष्ट्रउभारणीच्या आणि समाजोपयोगी कार्याला पुढील यशस्वी वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

आज आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी वरिष्ठ महाविद्यालय कडा येथील प्राचार्य तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्रोफेसर डॉ. हरिदास विधाते सर आणि प्रा. सौ. मंगल विधाते मॅडम यांच्या लग्नाचा वाढदिवस आहे. या मंगल दिनाचे औचित्य साधून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. त्यांनी आतापर्यंत केलेल्या अतुलनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याचे स्मरण करत सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन व विशेष कौतुक करण्यात आले.

# बदनापूर पोलिसांना महिन्याला हप्ता देतो दुकान कसं बंद करता ? अवैध दारू विक्रेत्याची गावकऱ्यांना मर्डर ची धमकी

## ढोकसाळ येथे भेसळयुक्त दारुमुळे ३ जणांचा मृत्यू ८ दिवसांत कारवाई न झाल्यास ग्रामस्थांचा तीव्र आंदोलनाचा इशारा

जालना शेख फारुक

मी बदनापूर पोलिसांना महिन्याच्या महिन्याला हप्ता देतो माझं दुकान कोण बंद करणार ? जर यापुढे दुकानाकडे फिरकलात तर आमचा इतिहास लक्षात ठेवा माझ्या वडिलांनी मर्डर करून १८ वर्षे जेल भोगली आहे मीही मागे-पुढे पाहणार नाही अशा अत्यंत उद्दाम आणि सडके टोमणे मारत ढोकसाळ येथील एका अवैध दारू विक्रेत्याने चक्क संपूर्ण गावालाच जिवे मारण्याची धमकी दिल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या गुंडगिरीमुळे ढोकसाळ ता.बदनापूर येथील महिला आणि पुरुषांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून संतप्त गावकऱ्यांनी थेट पोलीस अधीक्षकांपर्यंत धाव घेतली आहे.भेसळयुक्त दारूने घेतला तिघांचा बळी अनेक कुटुंबे उद्ध्वस्त

मिळालेल्या माहितीनुसार मौजे ढोकसाळ येथे गेल्या तीन वर्षांपासून ताराचंद एकनाथ वाघ हा इसम कोणत्याही परवान्याशिवाय, हुकूमशाही पद्धतीने राजरोसपणे हातभट्टी देशी आणि विदेशी दारूचे दुकान चालवत आहे. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे या दुकानात मिळणाऱ्या भेसळयुक्त आणि विषारी दारूचे सेवन केल्यामुळे गावातील दोन ते तीन नागरिकांचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे.



गावातील अनेक हसती-खेळती कुटुंबे या दारूच्या विळख्यामुळे रस्त्यावर आली असून अनेक महिलांचे कुंकू पुसले गेले आहे.

पोलिसांच्या हप्त्या चा आणि मर्डर चा धाक

या विळख्यातून गावाला वाचवण्यासाठी जेव्हा ढोकसाळ येथील सुजाण नागरिकांनी आणि महिलांनी या अवैध दारू विक्रेत्याला दुकान बंद करण्याची विनंती केली तेव्हा त्याने कायद्याची आणि पोलिसांची भीती बाळगण्याऐवजी थेट खाकी वरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मी पोलिसांना हप्ता देतो असे जाहीरपणे सांगत त्याने गावकऱ्यांना थेट जिवे मारण्याची धमकी दिली. एका गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या दारू विक्रेत्याची एवढी हिंमत वाढतेच कशी ? आणि त्याला बदनापूर पोलिसांचे अभय आहे का ? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे.


८ दिवसांचा अल्टिमेटम अन्यथा तीव्र आंदोलन

या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन बदनापूर पोलीस निरीक्षक,जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक जालना यांना ढोकसाळ येथील समस्त गावकरी मंडळींच्या सह्यांचे निवेदन सादर करण्यात आले आहे.

## आमदार प्रकाश सोळंके यांनी बौद्ध समाजाच्या जमिनी लाटल्याच्या बातम्या धादांत खोट्या : मनोज साळवे

माजलगाव प्रतिनिधी

मौजे फुलेपिंपळगाव शिवारातील गट क्रमांक २० मधील गायरण जमीन ही बौद्ध समाजातील शेतकऱ्यांची असून, संबंधित शेतकरी अनेक वर्षांपासून ती जमीन कसून आपला उदरनिर्वाह करत असल्याची माहिती मनोज साळवे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सन २००५ ते २०१० या कालावधीत गट क्रमांक २० मधील ३३ शेतकऱ्यांपैकी केवळ दोन शेतकऱ्यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने जमीन विक्री केली होती. त्यानंतर आजपर्यंत कोणत्याही शेतकऱ्याने जमीन



विक्री केलेली नसून शासनाकडून पुढील कोणत्याही विक्रीस परवानगी देण्यात आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माझ्यासह गटातील कोणत्याही शेतकऱ्याची गायरण जमीन आमदार प्रकाश सोळंके यांनी खरेदी केलेली किंवा लाटलेली नाही, असा ठाम दावा मनोज साळवे यांनी केला आहे.

सध्या काही राजकीय व्यक्तींमार्फत सोशल मीडियावर आमदार प्रकाश सोळंके यांनी कमी भावात जमीन विकत घेतल्याच्या अफवा पसरवल्या जात आहेत. मात्र या दाव्यांना कोणताही तथ्यात्मक आधार नसल्याचे साळवे यांनी सांगितले. शासनाने कसण्यासाठी दिलेली जमीन आम्ही स्वतः कसत असून,

त्याबाबत चुकीची माहिती समाजमाध्यमांतून पसरवू नये, असेही त्यांनी म्हटले आहे. तसेच गट क्रमांक २० मधील कोणत्याही शेतकऱ्याने माधव निर्मळ यांच्याकडे आमदार प्रकाश सोळंके यांच्या विरोधात जमीन लाटल्याची तक्रार केलेली नसल्याचेही त्यांनी नमूद केले. माधव निर्मळ यांनी ज्या बाँड पेपरचा संदर्भ दिला आहे, तो गटातील शेतकऱ्यांच्या बनावट सह्या करून तयार करण्यात आलेला बनावट व बोगस दस्तऐवज असल्याचा आरोपही त्यांनी केला. काही वृत्तपत्रे व माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या बातम्यांमध्ये कोणतेही तथ्य नाही. माधव निर्मळ यांनी आमदार प्रकाश सोळंके यांच्याशी असलेल्या राजकीय मतभेदातून आमच्या जमिनीचा व बौद्ध समाजाचा गैरवापर करून खोट्या बातम्या पसरवल्या आहेत, असा आरोप मनोज साळवे यांनी केला.

# भोकरदन हादरले खाकीचा एकाच दिवशी डबल अटॅक

## म्हाडा कॉलनीतील सेक्स रॅकेटचा पर्दाफाश दारू माफियांचे अड्डेही जमीनदोस्त ८ आरोपी गजाआड

भोकरदन इसरारखान पठाण :-

अवैध धंदे बंद करा नाहीतर खाकीचा दणका सहन करा जालना जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबिर सिंह संधू यांच्या इशाऱ्याची शनिवारी भोकरदनमध्ये अक्षरश प्रचिती आली. एका दिवसात दोन मोठ्या धडक कारवाया करत भोकरदन पोलिसांनी सेक्स रॅकेट आणि दारू माफियांचे अड्डे उद्ध्वस्त करत अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणून सोडले. पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या ऑपरेशन क्लीन मुळे संपूर्ण शहरात खाकीचा दरारा पुन्हा एकदा जाणवू लागला आहे. म्हाडा कॉलनीत सेक्स रॅकेटवर धाड गेम ओव्हर शनिवारी दुपारी सुमारे २:४५ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी म्हाडा कॉलनीतील गजानन मंदिराजवळील टिनपत्र्याच्या शेडवर अचानक धाड टाकली. बाहेर जिल्ह्यातील महिलांना आणून सुरू असलेल्या देहव्यापाराच्या अड्ड्यावर पोलिसांनी रंगेहाथ कारवाई करत संपूर्ण रॅकेट उद्ध्वस्त केले. या कारवाईत गणपत सेठी, गिंताजली सेठी जागा मालक ज्ञानेश्वर वाघ यांना ताब्यात घेण्यात आले. घटनास्थळावरून तब्बल रु.३५,६८०/- रोख रक्कम जप्त करण्यात आली असून पीडित महिलांची सुखरूप सुटका करण्यात आली. आरोपी पती-पत्नीवर यापूर्वीही हसनाबाद पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. तिघांविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुपारनंतर दारू माफियांवर सर्जिकल स्ट्राईक सेक्स रॅकेटवरील धाडीनंतर काही तासांतच पोलिसांनी दुसरा मोठा अटॅक करत जाफ्राबाद-सिल्लोड रोड परिसरातील अवैध दारू अड्ड्यांवर एकाच वेळी धाडी टाकल्या.

पोउपनि.पवन राजपूत आणि पोउपनि.राकेश नेटके यांच्या नेतृत्वाखालील पथकाने परिसर सील करत देशी-विदेशी दारूचा साठा जप्त केला. या कारवाईत रु.१०,८००/- किमतीची दारू हस्तगत करण्यात आली.

जाळ्यात अडकलेले आरोपी अंकुश एकनाथ तळेकर पोस्ट ऑफिसजवळ भोकरदन सतिश सर्जेराव गाढेकर बाजारपट्टी भोकरदन विठ्ठल शेषराव उबाळे मासनपूर सदाशिव नारायण अंभोरे कोसगाव चौघांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ऑपरेशन क्लीनचा धडाका कायम या संपूर्ण कारवाईसाठी पोलीस अधीक्षक तेजबिर सिंह संधू, अतिरिक्त पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि डझ्झज डॉ. नितीन कटेकर यांचे मार्गदर्शन लाभले. पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी स्पष्ट इशारा देताना म्हटले की




तरुण पिढी बरबाद करणारे सर्व अवैध धंदे बंद केले जातील. शहर व ग्रामीण भागातील आणखी अड्ड्यांची यादी तयार आहे. नागरिकांनी माहिती द्यावी, माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल. भोकरदनमध्ये खाकीचा दरारा पुन्हा कायम एका दिवसात झालेल्या या दुहेरी धडक कारवाईनंतर भोकरदनमध्ये एकच चर्चा रंगली आहे

## १ जून पासून खाजगी कापूस खरेदी बंद राहणार– सभापती जयदत्त नरवडे

माजलगाव (प्रतिनिधी) कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रांमधील सर्व जिनिंग वर खाजगी कापूस खरेदी दि.०१ जून पासुन बंद राहणार असून तरी सर्व कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपला शिल्लक राहिलेला कापूस दिनांक १ जून २०२६ पर्यंत खाजगी जिनिंग वर विक्रीस आणावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

कापूस हंगाम २०२५-२६ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रामध्ये केंद्र शासनामार्फत (सीसीआय) १५ मार्च२०२६ पर्यंत कापूस खरेदी झाली



होती. त्यानंतर खाजगी कापूस केंद्रावर कापूस खरेदी सुरू आहे व तसेच सध्या खाजगी कापूस केंद्रावर हमीभावापेक्षा जास्त भाव मिळत आहे तरी शिल्लक राहिलेल्या कापूस उत्पादक शेतकरी बांधवांनी आपला कापूस दि. ०१ जून २०२६ पर्यंत खाजगी जिनिंग वर विक्रीस आणावा असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.

# आदित्य कृषी महाविद्यालयात २६० विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

### बँकिंग परीक्षांची भीती सोडा, यशाचे मार्ग सोपे होतील – सिद्धेश्वर कोगे

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य कृषी महाविद्यालयात 'बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी आणि कृषी पदव्युत्तर शिक्षणाचे महत्त्व' या विषयावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.




यावेळी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना 'अल्फा कोचिंग' (छत्रपती संभाजीनगर) चे संचालक व बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर कोगे म्हणाले विद्यार्थांनो बँकिंग परीक्षांची भीती सोडा, यशाचे मार्ग सोपे होतील. त्यांनी बँकिंग क्षेत्रातील विविध पदे, स्पर्धा परीक्षांची रचना आणि तयारीची रणनीती यावर सविस्तर प्रकाश टाकला. यावेळी २६० विद्यार्थी उपस्थित होते.आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवले जातात. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक आलेख उंचावत आहे. याचाच भाग म्हणून, स्पर्धा परीक्षांची अचूक रणनीती हा विद्यार्थांसाठी विशेष कार्यक्रम राबवण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून 'अल्फा कोचिंग' (छत्रपती संभाजीनगर) चे संचालक व बँक ऑफ इंडियाचे माजी सहाय्यक व्यवस्थापक सिद्धेश्वर कोगे (एम.एस्सी. अ‍ॅग्री इकॉनॉमिक्स) आणि मॅनेजर संजीत कदम उपस्थित होते. कोगे यांनी विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी सर्वप्रथम मनातील अभ्यासाची, विशेषतः गणित व इंग्रजी विषयांची भीती काढून टाकणे आवश्यक आहे. ही भीती नष्ट झाल्यास यश मिळवणे कसे सोपे होते, हे त्यांनी विविध उदाहरणांसह स्पष्ट केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना बँकिंग आणि कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षणाच्या संधींची स्पष्ट दिशा मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. श्रद्धा एडके यांनी केले, तर चोख नियोजन डॉ. राम मोरे यांनी सांभाळले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

संस्थेचे योगदान कौतुकास्पद!

आदित्य कृषी महाविद्यालयाचा भव्य कॅम्पस आणि विद्यार्थ्यांमधील कलागुण कौतुकास्पद आहेत. माजी विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रांत झालेली निवड, हे आदित्य शिक्षण संस्थेच्या प्रामाणिक प्रयत्नांचे आणि मोठ्या योगदानाचे प्रतीक आहे.

# परतूर मनपसंद हॉटेल मध्ये १००% दिव्यांग व्यक्तीला अमानुष मारहाण प्रहार चा प्रशासनाला ४८ तासांचा अल्टिमेटम

## माकडछाप गुंडगिरीने माणुसकी काळवंडली दोषींना तात्काळ अटक न झाल्यास जालना जिल्हा पेटून उठणार रवींद्र अंभोरे यांचा इशारा

परतूर पिराजी गायकवाड :-

परतूर शहरातील गुंडप्रवृत्तीच्या वाढलेल्या हिमतीची अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना मनपसंद हॉटेल मध्ये घडली आहे. हॉटेलच्या कॅबिनमध्ये बसण्यासारख्या अत्यंत किरकोळ आणि शुल्लक कारणावरून एका १००% दिव्यांग अपंग व्यक्तीला चौघांनी मिळून लाथाबुक्क्यांनी आणि काठीने बेदम अमानुष मारहाण केली. श्री. अली हसन मोहम्मदी असे या पीडित दिव्यांग बांधवाचे नाव असून स्वतःचे रक्षण करण्यास पूर्णपणे असमर्थ असलेल्या व्यक्तीवर झालेल्या या क्रूर हल्ल्यामुळे संपूर्ण परतूर शहर आणि जालना जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

या अमानवीय कृत्याविरोधात प्रहार क्रांती संघटना अत्यंत आक्रमक झाली असून त्यांनी प्रशासनाला दोषींवर कारवाई करण्यासाठी ४८ तासांचा थेट अल्टिमेटम दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार श्री. अली हसन मोहम्मदी हे मनपसंद हॉटेलमध्ये गेले असता केवळ कॅबिनमध्ये बसण्याच्या किरकोळ कारणावरून तिथे उपस्थित असलेल्या चौघांनी त्यांच्याशी वाद घातला. वाद एवढा विकोपाला गेला की, समोरची व्यक्ती १००% दिव्यांग आहे ती स्वतःचा



बचाव करू शकत नाही याचे साधे भानही त्या नराधमांना राहिले नाही. त्यांनी लोकशाही आणि कायद्याची ऐशीतैशी करत लाथाबुक्क्यांनी आणि काठीने श्री. मोहम्मदी यांना रक्तबंबाळ करेपर्यंत मारहाण केली. या घटनेने परतूर शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

# पुणे कृषी हॅकेथॉनमध्ये 'नॅनोविटा' ठरली मृदा आरोग्य व व्यवस्थापन विभागातील उपविजेता

## मुख्यमंत्री व कृषी मंत्र्यांच्या हस्ते १५ लाखाचा धनादेश,स्मृतीचिन्ह देवून डॉ.सोनाली चिंतामणी यांचा गौरव

जालना /प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आडगाव येथील डॉ.रविंद्र चिंतामणी व डॉ.सोनाली चिंतामणी यांनी सहकारी स्वप्नील शिंदे व सागर लोंढे यांच्या सोबतीने पुणे येथे उभारलेल्या नॅनोविटा इंटरनॅशनल कंपनीने पिकांच्या उत्तम, निरोगी वाढीसाठी व भरघोस उत्पादनासाठी बनवलेली प्रभावी उत्पादने शेतकऱ्यांच्या पसंतीस उतरली असून नुकत्याच पुणे येथे संपन्न झालेल्या पुणे कृषी हॅकेथॉनमध्ये नॅनोविटा इंटरनॅशनल प्रा. लि.कंपनी मृदा आरोग्य व व्यवस्थापन विभागात उपविजेता ठरली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'नॅनोविटा'च्या संचालिका डॉ. सोनाली चिंतामणी यांचा १५ लाख रुपये धनादेश व स्मृतीचिन्ह देवून गौरव करण्यात आला.

या पारितोषिक वितरण कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, हेमंत रासने, कृषी आयुक्त सूरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक राहूल महिवाल, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, जिल्हाधिकारी जितेंद्र हुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी गजानन पाटील, जिल्हा परिषदेचे कृषी सभापती अमोल नलावडे आदींसह इतर मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती

यावेळी बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या हॅकेथॉन स्पर्धेतील १८ निवडक नवकल्पनांना पुढील टप्प्यात विशेष मदत व मार्गदर्शन देण्यात येणार असून त्यापैकी किमान १२ प्रकल्प बाजारात यावेत,यासाठी शासन प्रयत्नशील असेल. त्याचप्रमाणे हवामान बदल, वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतीसमोरील विविध संकटांवर मात




करण्यासाठी तंत्रज्ञानाधारित शेती हा प्रभावी पर्याय आहे. हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम कृषी क्षेत्रावर होतो. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता,ड्रोन,उपग्रह आणी अचूक शेती पद्धतीसारख्या तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय शेती क्षेत्रातील संकट दूर करता येणार नाही,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तसेच 'पुढील वर्षापासून पुणे कृषी हॅकेथॉनचे 'महाराष्ट्र कृषी हॅकेथॉन' मध्ये रूपांतर करण्यात येणार असून, सर्वोत्तम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल, अशी घोषणाही फडणवीस यांनी केली.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह इतरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हाधिकारी जितेंद्र हुडी यांनी केले.

गेल्या वर्षी पुणे येथील स्टार्टअप एक्स्पोमध्ये मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते 'नॅनोविटा'ला बेस्ट स्टार्टअप अवार्डने गौरविण्यात आले होते. पुणे कृषी हॅकेथॉनमध्ये उपविजेत्या पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल संचालिका डॉ.सोनाली चिंतामणी, संचालक डॉ.रविंद्र चिंतामणी, स्वप्नील शिंदे व सागर लोंढे तसेच मदतनीस ऋषिकेश गोसावी, प्रियंका विश्वकर्मा यांच्यासह नॅनोविटा च्या सर्व टीमवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जैन साध्वींच्या संशयास्पद मृत्यूने देशभरात संतापाची लाट अंबडमध्ये सकल जैन समाजाचा विशाल मौन जुलूस

## राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण लागू करा सीबीआय चौकशीच्या मागणीसाठी तहसीलदारांना ठणकावून दिले निवेदन

अंबड प्रतिनिधी :-

मध्य प्रदेशात कलेक्ट्रेट भवनासमोर विहार करणाऱ्या जैन साध्वी आर्यिका श्री १०५ श्रुतमति माताजी आणि आर्यिका श्री १०५ उपशममति माताजी यांच्या झालेल्या दुर्दैवी व संशयास्पद अपघाती निधनानंतर संपूर्ण देशासह अंबडमध्येही जैन समाज प्रचंड आक्रमक झाला आहे. या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी आणि संतांच्या सुरक्षेसाठी आज सकल जैन समाज अंबडच्या वतीने एक विशाल मौन जुलूस काढण्यात आला. समाज बांधवांच्या डोळ्यांतील अश्रू आणि मनातील तीव्र संताप या मूक मोर्चात स्पष्टपणे जाणवत होता. मोर्चाच्या सांगतेनंतर आंदोलकांनी तहसीलदारांना मागण्यांचे थेट निवेदन सादर केले.हा केवळ अपघात की घातपात ? उच्चस्तरीय चौकशीची मागणी

राष्ट्रसंत आचार्य श्री १०८ विद्यासागर जी महाराज यांच्या परम विदुषी शिष्यांचा असा अकाली आणि वेदनादायी मृत्यू होणे ही संपूर्ण मानवजातीला हादरवून सोडणारी घटना आहे. जैन समाजाने थेट आरोप केला आहे की ही घटना केवळ एक साधा रस्ता अपघात असू शकत नाही उपलब्ध व्हिडिओ क्लिप्स आणि घटनास्थळावरील परिस्थिती पाहता यामागे मोठे कारस्थान असण्याची दाट शक्यता असून समाजात संशयाचे वातावरण आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक आणि सीबीआय किंवा न्यायालयीन चौकशी झालीच पाहिजे अशी आक्रमक मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

अहिंसेचे दूत असुरक्षित का ? समाज बांधवांचा संतप्त सवाल

जैन साधू-संत हे पूर्णत अहिंसक निःशस्त्र आणि पायी विहार करणारे कठोर तपस्वी असतात. ते स्वतःसाठी कोणतीही सुरक्षा वाहन किंवा आधुनिक सुविधा स्वीकारत नाहीत. संपूर्ण जगाला शांतता आणि संयमाचा संदेश देणाऱ्या अशा पवित्र संतांवर महामार्गांवर वाढत्या दुर्घटना आणि हल्ले होणे अत्यंत चिंताजनक आणि प्रशासनाचे अपयश दर्शवणारे आहे अशी तीव्र भावना समाज बांधवांनी व्यक्त केली.

जैन समाजाच्या प्रमुख आणि रोखठोक मागण्या

सीबीआय चौकशी व पुरावे संवर्धन या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्यात यावी. घटनेशी संबंधित सर्व सीसीटीव्ही फुटेज व्हिडिओ आणि डिजिटल पुरावे तात्काळ सुरक्षित करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी.

राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण केंद्र सरकारने तात्काळ राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण लागू करावे.पायी विहार करणाऱ्या संतांसाठी विशेष सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे डजझतयार करण्यात यावीत.

विशेष सुरक्षा प्रोटोकॉल महामार्गांवर व संवेदनशील भागात संतांच्या विहारादरम्यान पोलिस संरक्षण वाहतूक नियंत्रण आणि चेतावणी फलक लावण्यात यावेत.

विशेष संवेदनशील श्रेणी संतांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांना विशेष संवेदनशील श्रेणीत समाविष्ट करून जलदगती न्यायालयात खटले चालवावेत.

तर देशभर तीव्र आंदोलन छेडणार प्रशासनाला गर्भित इशारा अंबड येथील सकल जैन समाजाने प्रशासनाला स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की जैन संतांच्या सुरक्षेबाबत केंद्र व राज्य सरकारने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत तर हा केवळ मौन मोर्चा न राहता भविष्यात संपूर्ण देशभर तीव्र आणि उग्र आंदोलन उभारले जाईल ज्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल.

या मौन जुलूसमध्ये अंबड शहरातील सकल जैन समाजाचे अबालवृद्ध महिला,मुली आणि तरुण मोठ्या संख्येने काळ्या फिती लावून आणि निषेधाचे फलक हातात घेऊन सहभागी झाले होते.





## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण सोहळा संपन्न

### विरखेडा भालके येथे मोठ्या उत्साहात स्मारकाचे अनावरण

जाफराबाद प्रतिनिधी :-

तालुक्यातील विरखेडा भालकी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे अनावरण सोहळा मोठ्या उत्साहात आणि भव्य दिव्य पद्धतीने संपन्न झाला आहे.

विरखेडा भालके गावकऱ्यांच्या वतीने विरखेडा येथे भरपूर दिवसापासून प्रतीक्षेत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी विरखेडा येथील ४ नवविवाहित जोडप्यांच्या हस्ते विधिवत पूजा करून दुग्ध अभिषेक करून पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. तत्पूर्वी वीरखेडा गावातून पुतळ्याची मिरवणूक काढून छत्रपती शिवाजी महाराज की जय, छत्रपती संभाजी महाराज की जय, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशांच्या गजरेत गावातून मिरवणूक काढून पुतळ्याचे अनावरण गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते. या ऐतिहासिक सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि शिवमय वातावरण निर्माण झाले आहे.

गावकऱ्यांचा उत्साह:

विरखेडा भालकी परिसरातील प्रत्येक घरासमोर रांगोळ्या काढून आणि गुढ्या उभारून गावकऱ्यांनी हा सोहळा एका मोठ्या सणासारखा साजरा केला. यावेळी उपस्थित.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अनावरण झाल्यानंतर गावकऱ्यांच्या वतीने भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने परिसरातील शिवभक्तांची महाप्रसादाचा आनंद घेण्यासाठी उपस्थिती होते.

## शिक्षकांची एकता : शिक्षकपत्नीच्या उपचारासाठी आष्टी तालुक्यातील शिक्षक परिवाराची मदतीची साखळी

### आजतागायत शिक्षकांनी उभा केला २ लाख ५० हजारांचा निधी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) समाजाचा आधारस्तंभ मानला जाणारा शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारा नसून संकटसमयी सहकाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा संवेदनशील घटक असल्याचे प्रेरणादायी उदाहरण आष्टी तालुक्यात पाहायला मिळाले आहे. आष्टी येथील पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशालेतील माध्यमिक शिक्षक श्री. सुरेश मोगलाजी नरोड यांच्या पत्नी सौ. मंजुश्री सुरेश नरोड या गंभीर आजाराने त्रस्त असून त्यांच्या उपचारासाठी आष्टी तालुक्यातील शिक्षक परिवाराने पुढाकार घेत अवघ्या काही दिवसांत तब्बल २ लाख ५० हजार रुपयांचा निधी उभारून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, सौ. मंजुश्री नरोड या मागील एका वर्षापासून गंभीर आजाराशी झुंज देत आहेत. त्यांच्यावर विविध ठिकाणी उपचार सुरू असून सध्या प्रकृती चिंताजनक असल्याने अधिक तज्ज्ञ उपचारांची गरज निर्माण झाली आहे. पुढील उपचारांसाठी त्यांना पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात हलविण्याची तयारी सुरू असून उपचारांचा मोठा खर्च अपेक्षित आहे. यामुळे नरोड कुटुंब आर्थिक तसेच मानसिक तणावाखाली आले होते. यापूर्वीच श्री. सुरेश नरोड यांनी स्वतःची ओपन हार्ट सर्जरी करून घेतली असून त्यासाठी सुमारे १५ लाख रुपयांपर्यंत खर्च झाल्याने कुटुंबावर मोठा आर्थिक भार पडला होता. त्यातच पत्नीच्या गंभीर आजारामुळे कुटुंबासमोर मोठे संकट उभे ठाकले. ही बाब लक्षात घेत जिल्हा परिषद शिक्षक परिवार आष्टी, सेवानिवृत्त शिक्षक, तालुक्यातील विविध शिक्षक संघटना तसेच महिला शिक्षक भगिनींनी मदतीचा हात पुढे केला.

या पार्श्वभूमीवर शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी व आष्टी तालुक्यातील काही ठराविक शिक्षक बांधवांनी तालुक्यातील शिक्षकांना मदत करण्याचे आवाहन केले होते. संकट कितीही मोठे असले तरी आपण सर्वजण एकत्र आलो, तर त्याची तीव्रता कमी करता येते. शिक्षक हे केवळ अध्यापनाचे कार्य करत नाहीत, तर एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे कुटुंब म्हणून उभे राहतात, हे या स्तुत्य उपक्रमावरून दिसून येते. शिक्षक परिवाराच्या आवाहनाला आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्यातील शिक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सोशल मीडियाच्या माध्यमातून तसेच वैयक्तिक संपर्कातून मदतीचे आवाहन करण्यात आले. परिणामी अल्पावधीतच २ लाख ५० हजार रुपयांचा निधी जमा करण्यात यश आले. ही रक्कम सौ. मंजुश्री नरोड यांच्या पुढील उपचारासाठी सुपूर्द करण्यात येणार आहे.

या मदत उपक्रमात ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस यांच्या मार्गदर्शनाखाली मिलिंद नेटके, नवनाथ भोरे, राजेंद्र शेळके यांनी समन्वयाची महत्त्वपूर्ण भूमिका बजावत शिक्षक बांधवांपर्यंत मदतीचे आवाहन पोहोचवले. त्यांच्या प्रयत्नांमुळे निधी संकलन मोहीम प्रभावी ठरली. दरम्यान, उपचारासाठी लागणारा खर्च मोठा असल्याने शिक्षक परिवाराकडून अजूनही सहकार्याचे आवाहन सुरू आहे. शिक्षक बांधवांनी दाखवलेली संवेदनशीलता, एकजूट आणि सामाजिक जबाबदारीची भावना ही केवळ नरोड कुटुंबासाठी आधार ठरलेली नसून संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण बनली आहे. संकटसमयी आपलेपणाची भावना जपणारा शिक्षक समाज आजही माणुसकीचे मूल्य जिवंत ठेवत असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

## कासेवाडी येथे २२ व्या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची आज सांगता

ह.भ.प.महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथे गेल्या २२ वर्षांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची आज मोठ्या उत्साहात सांगता होत आहे. दिनांक १९ मे ते २६ मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहा निमित्ताने गेल्या आठ दिवसांपासून कासेवाडी व परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू होती. या सप्ताहाची सांगता आज दिनांक २६ मे रोजी गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होत असून, सकाळी ९ ते ११ या वेळेत हा सोहळा संपन्न होईल. कीर्तनानंतर लगेचच भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, कासेवाडी, आंबेवाडी, ब्रह्मगाव यांच्यासह पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कासेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

या आठ दिवसांच्या सप्ताहाच्या कालखंडात दररोज पहाटे काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ आणि प्रवचन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहामध्ये रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. ईश्वरी ताई नागरगोजे, ह.भ.प. अजिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प. दादा हरी महाराज ठाकरे, ह.भ.प. किशोर महाराज खाडे, ह.भ.प. अशोक महाराज शास्त्री, ह.भ.प. काशिनाथ महाराज आणि ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांचे हरिकीर्तन संपन्न झाले. तर ह.भ.प. कल्याण वाल्हेकर, ह.भ.प. गोविंद पवार, ह.भ.प. श्रद्धाताई गिरी, ह.भ.प. परमेश्वर महाराज शास्त्री, ह.भ.प. तुकाराम महाराज भोसले, ह.भ.प. अशोक डोके सर आणि ह.भ.प. मच्छिंद्र महाराज राऊत यांचे अभ्यासपूर्ण प्रवचन संपन्न झाले. आज महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने आणि महाप्रसादाने या महोत्सवाची सांगता होत आहे.

## उमेश दळवी हत्या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी:पप्पू कागदे

बीड/प्रतिनिधी

बीड शहरातील बांगरनाला गोरे वस्ती येथील रहिवासी उमेश नवनाथ दळवी वय ४० वर्ष यांची दि.२४ मे २०२६ रात्री ३ वाजता सहारा हॉटेल समोर, अवैध दारु विक्री करणाऱ्या शेख इरफान, शेख समद उर्फ लाला शेख रा.बालेपीर यांच्यासह शून्या शेख व पिल्लू शेख यांनी निर्दयपणे मारहाण करून उमेश दळवी यांची निर्घृणपणे हत्या केली आहे. या हत्या प्रकरणातील आरोपी शेख इरफान शेख समद उर्फ लाला शेख यांच्यासह इतर आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. अशी मागणी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्याकडे केली.



सहारा हॉटेल समोर शेख इरफान शेख समद उर्फ लाला शेख यांचे अवैध दारू विक्रीचे दुकान असून त्या ठिकाणी उमेश दळवी हा कामगार म्हणून काम करीत होता. रविवार दि. २४ मे २०२६ रोजी त्याला नग्न करून बेदमपणे मारहाण करीत त्याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या हत्या प्रकरणाचा रिपाइंच्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून या हत्या प्रकरणात शेख इरफान शेख समद उर्फ लाला शेख यास आरोपी करण्यात आले असून या हत्या प्रकरणातील शून्या शेख व पिल्लू शेख यांना सहआरोपी करण्यात यावे. या हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. अशी मागणी रिपाइंच्या वतीने अतिरिक्त पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांच्याकडे युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केली. यावेळी राजू जोगदंड, बबन वडमारे, मुकुंद धुताडमल, अविनाश जोगदंड, सुभाष तांगडे, दशरथ सोनवणे, के. के.कांबळे, मनोज वाघमारे, धम्मा पारवेकर, बाबा देशमाने, बाळासाहेब गव्हाणे, सुनील शिंदे, रतन वाघमारे, दयानंद उजगरे,

## पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल गजानन आवारे यांना शांतीब्रम्ह श्रीसंत एकनाथ महाराज सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित

पैठण :पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याबद्दल गजानन आवारे यांचा सन्मान ग्रामीण भागातील सामाजिक प्रश्न, जनसामान्यांच्या समस्या आणि विकासात्मक विषयांवर सातत्याने प्रभावी वृत्तांकन करणारे पैठण येथील ज्येष्ठ पत्रकार गजानन आवारे पाटील यांना शांतीब्रम्ह श्रीसंत एकनाथ महाराज सेवा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुरुषोत्तम मासानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरी पारायण व त्रिपूर्ती सेवा गौरव सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यावेळी ह.भ.प. श्री.महंत प्रमोद महाराज जगताप, संस्थानाधिपती ह.भ.प. श्रीगुरु रावसाहेब महाराज गोसावी तसेच ह.भ.प. नाथ वंशज पुष्कर महाराज गोसावी यांच्या हस्ते गजानन आवारे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पत्रकारिता क्षेत्रात समाजाभिमुख व निर्भीड वृत्तांकन करून गजानन आवारे यांनी वेगळी ओळख निर्माण केली आहे.



ग्रामीण भागातील प्रश्नांना न्याय देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केल्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे मान्यवरांनी सांगितले.

या सोहळ्यास श्रीमद जगद्गुरू सच्चिदानंद अभिनव विद्यानृसिंह भारती शंकराचार्य महाराज (संकेश्वर पीठ, कर्नाटक) यांचे उत्तराधिकारी जगद्गुरू शंकरभारती महास्वामी महाराज, ह.भ.प. श्री.महंत प्रमोद महाराज जगताप, ह.भ.प. श्री.अमृताश्रम स्वामी महाराज (बीड), संस्थानाधिपती ह.भ.प. श्रीगुरु रावसाहेब महाराज गोसावी, ह.भ.प. नाथ वंशज पुष्कर महाराज गोसावी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

हा पुरस्कार सोहळा ह.भ.प. श्री.रावसाहेब महाराज गोसावी, संस्थानाधिपती श्रीनाथ संस्थान श्रीक्षेत्र पैठण यांच्या मार्गदर्शनाखाली बाहेरील नाथ मंदिर, श्रीक्षेत्र पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात संपन्न झाला.

## पुण्यात नारी शक्ती चा गौरव डोमेगावच्या सविता शेळके यांचा राज्यस्तरीय सन्मान

दैनिक चालू वार्ता नारी गौरव पुरस्कार २०२६ ने सन्मानित अंबड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

अंबड प्रतिनिधी :-

पुणे येथे आयोजित भव्य आणि दिमाखदार सोहळ्यात डोमेगाव ता. अंबड येथील सामाजिक कार्यकर्त्या सविता बाबासाहेब शेळके यांना दैनिक चालू वार्ता नारी गौरव पुरस्कार २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान तसेच विविध उपक्रमांमधील सक्रिय सहभागाची दखल घेत हा मानाचा पुरस्कार त्यांना देण्यात आला.




या राज्यस्तरीय सन्मानामुळे डोमेगावसह संपूर्ण अंबड तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. पुरस्कार स्वीकारताना सविता शेळके यांनी हा सन्मान समाजातील सर्व कष्टकरी, संघर्षशील आणि स्वप्नांसाठी झटणाऱ्या महिलांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली.

कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर महिला उद्योजिका सामाजिक कार्यकर्त्या आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सविता शेळके यांचा गौरव करण्यात आला.

त्यांच्या या यशाबद्दल डोमेगाव परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून सामाजिक, शैक्षणिक आणि महिला बचत गट क्षेत्रातील कार्यासाठी त्या नेहमीच पुढाकार घेत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

महिलांनी स्वतःच्या कर्तृत्वावर उभे राहून समाजात वेगळी ओळख निर्माण करावी असा प्रेरणादायी संदेशही सविता शेळके यांनी यावेळी दिला.



## दावरवाडीत अखंड राम कृष्ण हरी जपाची सांगता...!

दावरवाडी प्रतिनिधी/ दावरवाडी येथे गेल्या सात दिवसापासून गावातील महिलांनी अखंड राम कृष्ण हरी मंत्र साधना श्रीराम मंदिरामध्ये ठेवण्यात आला होता सतत सात दिवस चोवीस तास।।जय जय राम कृष्ण हरी।। ह्या मंत्राचा महिलांनी जप चालू ठेवला होता आज अखंड रामनाम जपाची सांगता झाली राम नाम जपाच्या निमित्ताने नांदर येथील ह भ प तळपे महाराज यांचे त्या निमित्ताने कीर्तन ठेवण्यात आले होते किर्तन ऐकण्यासाठी गावातील भाविक भक्त व महीला यांची गर्दी होती राम नाम जपाच्या मंत्राने दावरवाडी गाव सात दिवसात पवित्र झाले असे तळपे महाराज यांनी सांगितले आहे

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

## पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद; एसडीएम सायकलवर कार्यालयात, मात्र सरकारी वाहन मागोमाग

अरवल : इंधन बचत आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी अरवल येथील उपविभागीय अधिकारी (एसडीएम) संजिव कुमार यांनी



सायकलवरून कार्यालयात जात पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला. मात्र, त्यांच्या या उपक्रमादरम्यान अधिकृत सरकारी वाहन सतत त्यांच्या मागे हळूहळू धावत असल्याचे दृश्य चर्चेचा विषय ठरले आहे.

माहितीनुसार, एसडीएम संजीव कुमार यांनी वाढते प्रदूषण, इंधन बचत आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी सायकलचा वापर केला. उन्हाच्या तीव्र झळांमध्ये त्यांनी सायकल चालवत कार्यालय गाठले. मात्र, त्यांच्या सुरक्षेसाठी किंवा प्रोटोकॉलच्या कारणास्तव सरकारी वाहन त्यांच्यामागे सुरू अवस्थेत चालत राहिले.

या घटनेचा व्हिडीओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली असून, नागरिकांकडून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले, तर काहींनी प्रत्यक्ष परिणामांपेक्षा दिखावा अधिक महत्त्वाचा ठरत आहे का? असा सवाल उपस्थित केला.

# बीड जिल्हा पोलीस दलात मोठा फेरबदल; ४४ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश

बीड( प्रतिनिधी) : जिल्हा पोलीस दलातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी तसेच कामकाजात गती आणण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी रविवारी (दि. २४) पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षकांच्या मोठ्या प्रमाणावर बदल्यांचे आदेश जारी केले. या बदली प्रक्रियेत प्रशासकीय कारणांसह अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विनंत्यांचाही सकारात्मक विचार करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे.

या मोठ्या फेरबदलामुळे पोलीस वर्तुळात हालचालींना वेग आला असून बदली झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा पोलीस दलात झालेल्या या बदल्यांमुळे विविध पोलीस ठाण्यांच्या नेतृत्वातही मोठे बदल झाले आहेत.

अधिकृत आदेशानुसार बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांची केज पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. तर पाटोदा येथील पोलीस निरीक्षक विनोद घोलवे यांच्याकडे बीड शहर पोलीस ठाण्याच्या प्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

नियंत्रण कक्षात कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्याकडे आता वाहतूक शाखेचा कार्यभार देण्यात आला आहे. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली असून होम डीवायएसपी पदावर कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक उमाकांत कस्तुरे यांची पाटोदा पोलीस ठाण्याच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच केज येथून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांची शिवाजीनगर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या या निर्णयामुळे पोलीस प्रशासन अधिक सक्षम व गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या फेरबदलामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास तसेच गुन्हेगारी नियंत्रणासाठी अधिक प्रभावी कामकाज होईल, असा विश्वास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हा पोलीस दलातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी तसेच कामकाजात गती आणण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी रविवारी (दि. २४) पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षकांच्या मोठ्या प्रमाणावर बदल्यांचे आदेश जारी केले.

## गेवराई नगर परिषद पोटनिवडणूक, प्रभाक क्रमांक ११ आणि अर्ज पण आले ११ उमेदवारी अर्ज दाखल

गेवराई, (प्रतिनिधी) :- गेवराई नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ११ च्या पोटनिवडणूकीसाठी अद्याप एकही अर्ज दाखल झालेला नाही. अर्ज दाखल करण्याची मुदत आज सोमवार ता. २५ रोजी तीन वाजता संपणार असून दुपारपर्यंत राहूल खंडागळे, सायमा आकेब काझी, फराह बेगम अब्दुल मन्ना, जालिंदर पिसाळ, विमल जालिंदर पिसाळ हे पाच उमदेवारी अर्ज दाखल झाले होते. दरम्यान, गेवराई नगर परिषद भारतीय जनता पक्षाच्या ताब्यात आहे. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. पाच महिन्यांपासून पोटनिवडणूक लांबली होती. दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या उमेदवार दूरदाना बेगम सलीम फारुकी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले होते. दोन सदस्यीय प्रभाग असल्याने महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम १९६५ नुसार संपूर्ण प्रभागाची निवडणूक स्थगित करण्यात आली होती. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दि. १८ मे ते २५ मे २०२६ या कालावधीत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. दि. २० जून २०२६ रोजी मतदान होणार आहे. दि. २१ जून रोजी मतमोजणी व निकाल जाहीर करण्यात येणार आहे. दरम्यान, गेवराई नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ११ च्या पोटनिवडणूकीसाठी २५ में २०२६ १२ ते १:०० वाजे पर्यंत एकही अर्ज दाखल झालेला नाही नव्हता. दुपार पासून अर्ज येण्यास सुरवात झाली दोन्ही जागे साठी एकूण ११ अर्ज दाखल करण्यात आले आहे.

प्रभाग क्रमांक ११ चे इच्छुक उमेदवार
प्रभाग क्रमांक ११ जागा क्रमांक अ चे प्राप्त झालेले अर्ज
काझी सायेमा आकेफ ,विमलबाई जालींदर पिसाळ
फरहाबेगम अब्दुल मन्नान, मेहरुनिसा मन्सूर शेख
प्रभाग क्रमांक ११ जागा क्रमांक ब चे प्राप्त झालेले अर्ज
खंडागळे राहुल शंकरराव,पठाण शाहरुख महेमूद
बेदरे माधव उत्तमराव, शेख आलमान शेख सुभान
,जालिंदर मल्हारराव पिसाळ,इस्माईल सलीमोद्दिन फारुकी,जुनेद जानमोहंमद बागवान



# मैत्रीच्या दुनियेतील बादशहा संतोष भैय्या सानप यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा भव्य वर्षाव

### जिवाभावाची मैत्री आणि जनसंपर्कातून निर्माण केली वेगळी ओळख

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यात मैत्री, सामाजिक बांधिलकी आणि जिवाभावाच्या नात्यांमुळे विशेष ओळख निर्माण करणारे, मैत्रीच्या दुनियेतील बादशहा म्हणून परिचित संतोष भैय्या सानप यांचा दि. २५ मे २०२६ रोजी असणारा वाढदिवस उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त मित्रपरिवार, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, नातेवाईक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा अक्षरशः वर्षाव करण्यात आला. माणसांशी जिव्हाळ्याने नाते जपणारा, संकटाच्या प्रसंगी धावून जाणारा आणि सुख-दुःखात कायम सोबत उभा राहणारा मित्र म्हणून संतोष भैय्या सानप यांची ओळख आहे. त्यामुळेच मित्रपरिवारात त्यांना प्रेमाने मैत्रीच्या दुनियेतील बादशहा अशी उपमा दिली जाते. त्यांच्या मैत्रीतील आपुलकी, विश्वास आणि माणुसकीचा जिव्हाळा अनेकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करून गेला आहे. वाढदिवसानिमित्त तयार करण्यात आलेल्या शुभेच्छा संदेशातही मैत्रीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. जीवनात बरेच मित्र येतात आणि जातात; परंतु आपल्यासारखे मित्र मोठ्या नशिबाने मिळतात. तुमचं आयुष्य असंच कणाकणाने वाढत राहो, अशा शब्दांत त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. या शुभेच्छांमधून संतोष भैय्या सानप यांच्याविषयी असलेला जिव्हाळा आणि आदर स्पष्टपणे दिसून येतो. संतोष भैय्या सानप हे सामाजिक उपक्रम, लोकसहभाग आणि सार्वजनिक कामांमध्ये सक्रिय सहभाग घेणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. समाजातील विविध स्तरांतील लोकांशी त्यांनी जपलेला आत्मीय संवाद आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती यामुळे त्यांनी मित्रपरिवारात आणि सामाजिक क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले आहे. गरजूंना मदत, सामाजिक कार्यक्रमात सहभाग आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती संवेदनशील भूमिका यामुळे ते अनेकांच्या विश्वासाचे केंद्र बनले आहेत.

त्यांच्या साध्या, मनमिळाऊ आणि



सहकार्यशील स्वभावामुळे मित्रपरिवार मोठ्या प्रमाणात जोडला गेला असून, कुणाच्याही अडीअडचणीत मदतीसाठी तत्पर राहण्याची त्यांची वृत्ती सर्वांना प्रेरणादायी वाटते. अनेक तरुणांमध्ये त्यांनी सकारात्मक विचार, सामाजिक बांधिलकी आणि मैत्रीतील विश्वासाचे महत्त्व रुजविण्याचे काम केले असल्याची भावना त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली. यावेळी आष्टी तालुका युवा पत्रकार संघ, ता. आष्टी, जि. बीड यांच्या वतीनेही संतोष भैय्या सानप यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, निरोगी आयुष्य आणि सामाजिक क्षेत्रातील अधिक यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. आगामी काळातही त्यांनी समाजहिताच्या कार्यात अधिक जोमाने कार्यरत राहून आपल्या मैत्रीचा आणि सामाजिक बांधिलकीचा ठसा अधिक गडद करावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.वाढदिवसानिमित्त दिवसभर मित्रपरिवार, शुभेच्छुक, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार बांधवांकडून शुभेच्छांचा ओघ सुरू होता. अनेकांनी प्रत्यक्ष भेटून, दूरध्वनीद्वारे तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा देत त्यांच्या दीर्घायुष्य व उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. मैत्री, विश्वास आणि माणुसकीची नाळ जपणारे मैत्रीच्या दुनियेतील बादशहा संतोष भैय्या सानप यांचा वाढदिवस यानिमित्ताने सर्वांसाठीच आनंदाचा आणि आत्मीयतेचा क्षण ठरला.

## आदिवासी मन्नेरवारलू समाजाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे : लक्ष्मणराव ठक्करवाड

किनवट । प्रतिनिधी

राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या माध्यमातून समाज बांधवांनी एकत्रित येऊन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याची गरज असून, समाजहितासाठी हेवेदावे व गटतट विसरून एकसंघ होणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाचे अध्यक्ष लक्ष्मणराव ठक्करवाड यांनी केले. किनवट येथे दि. २१ मे २०२६ रोजी आयोजित समाज संवाद बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या वतीने राज्यभर सामाजिक संवाद बैठकींचे आयोजन करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून नांदेड जिल्ह्यात तालुकानिहाय बैठका आयोजित करण्यात आल्या आहेत. या बैठकीस महासंघाचे राष्ट्रीय सचिव सुरेश अंबुलगेकर, कोषाध्यक्ष नामदेवराव मिठेवाड, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता मोहनराव गोपुलवाड, बाबुराव पुजरवाड, दिलीपराव बास्टेवाड, मधुकर उन्हाळे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते. यावेळी राष्ट्रीय सचिव सुरेश अंबुलगेकर यांनी समाजासमोरील ज्वलंत प्रश्न, विविध स्तरांवर होत असलेला अन्याय आणि समाज संघटनात्मक बळकटीची आवश्यकता यावर सविस्तर मार्गदर्शन केले. समाजातील अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून समाजाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. बैठकीत किनवट तालुक्यातील विविध गावांतील प्रतिनिधी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी राष्ट्रीय आदिवासी मन्नेरवारलू महासंघाच्या कार्यावर विश्वास व्यक्त करत संघटनेच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच तालुका स्तरावर महासंघाची कार्यकारिणी स्थापन करून गावनिहाय संघटन उभारणी करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. समाजाच्या एकजुटीसाठी सातत्याने कार्य करण्याची भावना समाजबांधवांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास रामरेड्डी आईटवार, मन्नेरवारलू समाज असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. पुरुषोत्तम येरडलावार, तालुकाध्यक्ष सुभाष कालावार, समाज संघटनेचे अध्यक्ष किशनराव यासमवार, पंडित रासमवार, सरपंच राकेश तोटावार, उपसरपंच महेश कनकावार, बालाजी न्यालमवार, गोलकुंडवार सर, व्यंकट तोटावार, संतोष माडपेलीवार आदींसह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा आदिवासी मन्नेरवारलू समाज असोसिएशनच्या वतीने पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

# कृषी उत्पन्न बाजार समिती किनवटच्या सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव

### उपसभापती राहुल नाईक यांच्यासह १३ संचालकांच्या स्वाक्षऱ्या ; समितीच्या राजकारणात खळबळ

किनवट /प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समिती, किनवटचे सभापती गजानन मुंडे यांच्या विरोधात उपसभापती राहुल नाईक यांच्यासह १३ संचालकांनी स्वाक्षरी करून अविश्वास प्रस्ताव दाखल केल्याने बाजार समितीच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. हा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नांदेड यांच्याकडे सादर करण्यात आला असून नियमानुसार विशेष सभा बोलावून गुप्त मतदानाद्वारे निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ च्या कलम २३ (१) अन्वये हा अविश्वास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रस्तावावर उपसभापती राहुल नाईक यांच्यासह १३ संचालकांच्या स्वाक्षऱ्या असून सभापतींच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

अविश्वास प्रस्तावामध्ये नमूद करण्यात आलेल्या आरोपांनुसार, सन २०२५-२६ हंगामात बाजार समितीमार्फत खरेदी करण्यात आलेल्या सोयाबीनचे चुकारे अद्याप शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून त्यांच्यात नाराजी वाढत असल्याचा आरोप संचालकांनी केला आहे. तसेच मागील दहा महिन्यांपासून बाजार समितीची मासिक सभा घेण्यात आलेली नसल्याचेही प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. संचालकांनी वारंवार पत्रव्यवहार व तोंडी सूचना देऊनही सभापतींकडून दुर्लक्ष करण्यात आल्याचे म्हटले आहे.

याशिवाय बाजार समितीच्या मागील शेतजमीन विक्रीतून प्राप्त झालेली १ कोटी ६१ लाख रुपयांची रक्कम बँकेत मुदतठेव (ऋऊ) स्वरूपात ठेवण्यात आली होती. मात्र संचालक मंडळाला



विश्वासात न घेता सभापती व सचिव यांनी संगनमताने सदर ऋऊ तोडून रकमेचा अपहार केल्याचा गंभीर आरोप अविश्वास प्रस्तावात करण्यात आला आहे. या प्रकरणात भ्रष्टाचार झाल्याचाही आरोप संचालकांनी केला आहे. सभापतींनी संचालक मंडळाला विश्वासात न घेता मनमानी कारभार केल्याचा आरोप करत बाजार समितीच्या दैनंदिन कामकाजात हलगर्जीपणा व प्रशासकीय अनियमितता वाढल्याचे संचालकांनी नमूद केले आहे. काही महत्त्वाचे अभिलेख व कागदपत्रे लॉक करून ठेवण्यात आल्यामुळे संचालकांना माहिती मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याचेही प्रस्तावात म्हटले आहे. उपरोक्त सर्व कारणांमुळे सभापती गजानन मुंडे यांच्या नेतृत्वावर आमचा विश्वास राहिलेला नसल्याचे संचालकांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे नियमानुसार सात दिवसांच्या आत विशेष सभा बोलावून अविश्वास प्रस्तावावर निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी जिल्हा उपनिबंधकांकडे करण्यात आली आहे. या प्रस्तावासोबत स्वाक्षरी करणाऱ्या सर्व संचालकांची यादी, पत्ते तसेच नोटरी प्रतिज्ञापत्र जोडण्यात आले असल्याची माहिती समोर आली आहे. अविश्वास प्रस्तावामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती किनवटमध्ये राजकीय हालचालींना वेग आला असून पुढील घडामोडीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात आ. भीमराव केराम यांचा सहभाग

### नागरिकांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन

किनवट /प्रतिनिधी

भारत सरकारच्या डिजिटल जनगणना अभियानाच्या पहिल्या टप्प्यास सुरुवात झाली असून नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आमदार भीमराव केराम यांनी केले.

दि. २३ मे २०१९ रोजी सकाळी ठीक ९:३० वाजता जनगणना पथक आमदार भीमराव केराम यांच्या निवासस्थानी जनगणना प्रक्रियेसाठी भेट दिली. यावेळी आमदार केराम यांनी स्वतः स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यानंतर संबंधित आयडी व आवश्यक माहितीच्या आधारे अधिकृत जनगणना नोंद करण्यात आली.

या प्रसंगी प्रगणक इसरार खान जफर खान, पर्यवेक्षक शमोहम्मद अतीक मोहम्मद कासिम तसेच प्रगणक उमाकांत कराळे उपस्थित होते. जनगणना प्रक्रियेदरम्यान प्रशासनाच्या वतीने नागरिकांना



डिजिटल माध्यमातून माहिती अचूकपणे नोंदविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

आमदार भीमराव केराम यांनी यावेळी सांगितले की, जनगणना ही देशाच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून शासनाच्या विविध योजना, सुविधा व विकासकामांचे नियोजन जनगणनेतील आकडेवारीवर आधारित असते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने योग्य व अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे.तसेच, जनगणना मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात स्वगणना पद्धतीला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून डिजिटल जनगणना प्रक्रियेमुळे काम अधिक पारदर्शक, सुलभ व वेगवान होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.प्रशासनाच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, जनगणना कर्मचारी आपल्या घरी आल्यानंतर आवश्यक माहिती प्रामाणिकपणे द्यावी तसेच ऑनलाईन स्वगणना सुविधेचाही अधिकाधिक वापर करावा.



## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्काराने लक्ष्मणराव भवरे यांचा गौरव

### इंदू मिल स्मारकाचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांच्याहस्ते नाशिकमध्ये सन्मान

नांदेड जिल्हा प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार देऊन नांदेड येथिल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार लक्ष्मण भवरे कामारीकर यांचा गौरव करण्यात आला.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्यांचे वंशज तथा,त्यांचे नातू, इंदू मिल स्मारकाचे प्रणेते, रिपब्लिकन सेनेचे सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते तसेच,रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुशील सुर्यवंशी, राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे, नाशिकच्या दै.महासागरचे वृत्त संपादक सुधीर उमराळकर, निसर्गोपचार तज्ञ रावसाहेब घोडेस्वार,नाशिक मनपाच्या स्थायी समितीचे मा.सभापती संजय साबळे,दक्ष पोलीस टाईम्सचे संजय डोंगरे, भिमकन्या रिलस्टार आसावरी बर्वे आणि संयोजक तथा, संस्थेचे अध्यक्ष अनिल आठवले,सचिव मिलिंद कळवणकर,सुप्रसिद्ध निवेदिका तथा,पत्रकार आश्विनी पुरी आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी दि.२३ मे रोजी,समुद्र लॉन्स,नाशिक येथे ज्ञानदिप सामाजिक विकास संस्था महाराष्ट्र च्यावतिने देशभरात विविध क्षेत्रांत उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.त्यात नांदेड जिल्ह्याचे सुपुत्र लक्ष्मण मारोती भवरे कामारीकर यांचा त्यांच्या सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात केलेल्या उत्तुग योगदानाबद्दल समावेश आहे. आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासीत जनसामान्यांचे प्रश्न परखडपणे प्रशासनासमोर मांडतांनाच भारतीय संविधानाचा प्रचार व प्रसार तसेच,वृक्षलागवड व संगोपन,पर्यावरणसमृद्धी आणि शैक्षणिक,सांस्कृतिक आदी क्षेत्रांसह सामाजिक कार्यातही त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असतो.नांदेड जिल्ह्यात पत्रकारिता क्षेत्रात व विविध सामाजिक संघटनात ते अग्रेसर असतात.त्यांच्या कार्य व कर्तव्यतत्परतेचा सन्मान म्हणून त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला.लक्ष्मण भवरे यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

सर्वौच्च सन्मान - लक्ष्मण भवरे.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवे त्यांचे नातू आनंदराजजी आंबेडकर यांच्या हस्ते मिळालेला पुरस्कार आपण सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात आजपर्यंत केलेल्या कार्याचा सर्वौच्च सन्मान व आगामी काळात प्रेरणा असल्याचे मत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार प्राप्त लक्ष्मण भवरे यांनी व्यक्त केले.

# बकरी ईदच्या निमित्त पोलिस प्रशासनाचे आवाहन; मुस्लिम धर्मगुरूंचा सकारात्मक प्रतिसाद



छत्रपती संभाजीनगर : आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने मुस्लिम समाजातील धर्मगुरूंशी महत्त्वपूर्ण बैठक घेत जनावरांची कुर्बानी न करण्याचे आवाहन केले. या बैठकीला शहरातील विविध मुस्लिम धार्मिक संघटनांचे पदाधिकारी व धर्मगुरू उपस्थित होते.

ही बैठक शहराचे पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी पोलिस प्रशासनाच्या वतीने बकरी ईद शांततेत आणि सामाजिक सलोखा जपत साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले. विशेषतः गोवंशीय जनावरांची कुर्बानी टाळावी, असे स्पष्टपणे सांगण्यात आले.

या आवाहनाला मुस्लिम धर्मगुरूंनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. समाजात शांतता व सौहार्द कायम ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारची गोवंशीय जनावरांची कुर्बानी केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच मुस्लिम बांधवांनीही अशा प्रकारच्या कृतींपासून दूर राहावे, असे आवाहन धर्मगुरूंनी केले.बैठकीदरम्यान, जर कोणी प्रशासनाच्या सूचनांचे उल्लंघन करून गोवंशीय जनावरांची कुर्बानी करण्याचा प्रयत्न केला, तर संबंधित व्यक्ती स्वतः त्यास जबाबदार राहील, असेही स्पष्ट करण्यात आले.यावेळी शहरातील विविध भागांतील मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी, धार्मिक नेते तसेच पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बकरी ईदचा सण शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन आणि समाजातील समन्वयाचे हे सकारात्मक पाऊल मानले

# पीएसीएल कंपनीतील अडकलेल्या गुंतवणूकदारांना न्याय द्या ; - बाजीराव ढाकणे

राष्ट्रपती व पंतप्रधानांना मा. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदन

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील हजारो गोरगरीब, कष्टकरी, ऊसतोड मजूर, शेतमजूर तसेच सर्वसामान्य नागरिकांचे पीएसीएल लिमिटेड कंपनीमध्ये अडकलेले कोट्यवधी रुपये तातडीने परत मिळावेत, यासाठी केंद्र शासनाने विशेष कार्यवाही करावी, अशी मागणी महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्यचे बीड जिल्हा समन्वयक श्री बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन मा. द्रोपदीजी मुर्मू राष्ट्रपती व मा. नरेंद्रजी मोदी पंतप्रधान भारत सरकार यांना मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत सादर करण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील अनेक गरीब, कष्टकरी, ऊसतोड मजूर व शेतमजूर कुटुंबांनी आपल्या आयुष्यभराच्या कष्टातून बचत केलेली रक्कम नोएडा स्थित पीएसीएल लिमिटेड कंपनीमध्ये गुंतवली होती. मात्र मागील सुमारे पंधरा वर्षांपासून या गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये कंपनीमध्ये अडकून पडले असून अद्यापही अनेकांना त्यांच्या हक्काचे पैसे परत मिळालेले नाहीत.



या प्रकरणामुळे जिल्ह्यातील अनेक कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. मुलामुलींच्या शिक्षणाचा खर्च भागविणे कठीण झाले असून आरोग्य उपचार, विवाह, घरबांधणी तसेच शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या खर्चासाठी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गरीब व कष्टकरी गुंतवणूकदारांना आपल्या हक्काच्या पैशासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

श्री बाजीराव ढाकणे यांनी केंद्र शासनाने या प्रकरणात विशेष लक्ष घालून संबंधित मंत्रालय, सेबी तसेच इतर सक्षम यंत्रणांमार्फत तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. तसेच लोकसभेत हा विषय उपस्थित करून बीड जिल्ह्यातील सर्व पात्र गुंतवणूकदारांना त्यांची रक्कम लवकरात लवकर परत मिळवून देण्यासाठी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.गरीब, कष्टकरी व ऊसतोड मजुरांच्या न्यायासाठी शासनाने संवेदनशील भूमिका घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.



मोमिन खालेद भाई अपेक्स हॉस्पिटल यांच्या मुलीच्या साखर पुडा ताज हॉल येथे संपन्न झाला त्याप्रसंगी शुभेच्छा देताना समाजसेवक मुसा खान पठाण केजीएन ग्रुपचे अध्यक्ष झहीर कादरी शहा व इतर दिसत आहेत...

# शिर्डीत दै.पुण्यनगरी परिवाराच्या वतीने दिमाखात पार पडला 'हिरोज ऑफ अहिल्यानगर २०२६' पुरस्कार सोहळा..!

साई संस्थान सोसायटीचे चेअरमन विठ्ठलराव पवार यांना खडझड कृष्णप्रकाश व पद्मश्री रहिबाई पोपेरे यांच्या हस्ते हिरोज ऑफ अहिल्यानगर पुरस्कार प्रदान

शिर्डी प्रतिनिधी: ( तुषार महाजन )

दैनिक पुण्यनगरी परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेला प्रतिष्ठित 'हिरोज ऑफ अहिल्यानगर २०२६' (क्शीशी ेष -हळश्रूरपरसरी २०२६) पुरस्कार वितरण सोहळा रविवारी सायंकाळी शिर्डी येथील हॉटेल सेंट लॉन येथे अतिशय दिमाखदार आणि उत्साही वातावरणात संपन्न झाला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय आणि निस्वार्थ कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा या भव्य सोहळ्यात गौरव करण्यात आला. या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते श्री साईबाबा एम्प्लॉईज क्रेडिट कोऑपरेटिव्ह सोसायटीचे चेअरमन श्री. विठ्ठलराव पवार यांचा झालेला विशेष सन्मान.

राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक (खडझड) श्री. कृष्णप्रकाश आणि 'बीजमाता' म्हणून जगभरात ओळखल्या जाणाऱ्या पद्मश्री सौ. राहीबाई पोपेरे यांच्या शुभहस्ते विठ्ठलराव पवार यांना मानाचा 'हिरोज ऑफ अहिल्यानगर २०२६' हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

एका सामान्य कर्मचाऱ्याचा थक्क करणारा आणि प्रेरणादायी प्रवास

विठ्ठलराव पवार यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या अथक परिश्रमाची पोचपावती आहे. श्री साईबाबा संस्थानामध्ये अत्यंत तळागाळात, म्हणजेच 'स्वच्छता विभागात' काम करणाऱ्या एका साधारण कर्मचाऱ्यापासून त्यांनी आपल्या प्रवासाची सुरुवात केली होती. तिथून ते थेट संपूर्ण राज्यात नावलौकिक असलेल्या आणि वार्षिक कोट्यवधी रुपयांची उलाढाल असलेल्या 'श्री साईबाबा एम्प्लॉईज क्रेडिट कोऑपरेटिव्ह सोसायटी, शिर्डी'च्या चेअरमनपदापर्यंत पोहोचले आहेत. त्यांचा हा इथपर्यंतचा संघर्षमय प्रवास थक्क करणारा आणि समाजासाठी एक मोठा आदर्श मानला जात आहे.

कामगार व शेतकरी हिताच्या कार्याची विशेष दखल



केवळ स्वतःची आणि संस्थेची प्रगती करण्यावरच न थांबता, विठ्ठलराव पवार यांनी धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात आपले मोठे योगदान दिले आहे.

कामगार वर्ग आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांनी कायमच पुढाकार घेतला. त्यांच्या याच सामाजिक कार्याची आणि तळमळीची विशेष दखल घेत आयोजकांनी त्यांना या मानाच्या पुरस्कारासाठी निवडले.मान्यवरांची उपस्थिती आणि मार्गदर्शनया भव्य पुरस्कार सोहळ्याला विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, स्थानिक नागरिक आणि साई संस्थानाचे असंख्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून, समाजासाठी झटणाऱ्या आणि तळागाळातून स्वकर्तृत्वावर वर आलेल्या अशा व्यक्तींना प्रोत्साहन मिळणे ही काळाची गरज आहे, असे स्पष्ट केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिक संतप्त; दुरुस्ती न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागासमोर आमरण उपोषणाचा इशारा

देगलूर । प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील सावरमाळ, सावळी ते मरखेल तसेच सावळी ते मष्णेर या प्रमुख मार्गांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने नागरिक, विद्यार्थी आणि रुग्णांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. वारंवार निवेदने देऊनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने संतप्त नागरिकांनी आता सार्वजनिक बांधकाम विभागासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.



या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत काळे बेन्नाळखर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन सादर केले आहे. यापूर्वीही १५ डिसेंबर २०२५, १९ डिसेंबर २०२५ व २६ डिसेंबर २०२५ रोजी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने देण्यात आली होती. त्यावेळी काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजपर्यंत ना रस्ता दुरुस्ती झाली ना डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले.

सावरमाळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे सावळी व बेन्नाळ परिसरातील रुग्णांना उपचारासाठी या मार्गाने ये-जा करावी लागते. खराब रस्त्यामुळे गर्भवती महिला व गंभीर रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

तसेच सावळी ते मष्णेर मार्गावर हिंदू धर्मियांचे प्रसिद्ध देवस्थान असल्याने तेलंगणा, कर्नाटक आणि महाराष्ट्रातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. मात्र रस्त्याची बिकट अवस्था आणि अर्धवट सोडलेले डांबरीकरण यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे.

मरखेल येथे विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याने परिसरातील विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी ये-जा करतात. मात्र रस्त्याच्या दुरवस्थेमुळे एस.टी. बससेवाही प्रभावित झाली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनावर त्याचा परिणाम होत आहे.

दरम्यान, संबंधित विभागाने तात्काळ रस्ता दुरुस्ती व डांबरीकरणाची कामे पूर्ण न केल्यास गुरुवार दि. २८ मे २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, मुखेड येथे आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# किनवटच्या अमन खानची अमेरिकेत शैक्षणिक भरारी

किनवट /प्रतिनिधी

शहराचे माजी नगराध्यक्ष ईसा खान यांचा नवासा, माजी नगराध्यक्ष निसार खान यांचा नातू आणि माजी नगराध्यक्ष साजिद खान व नगरसेविका जरीना खानम यांचा चिरंजीव अमन खान याने अमेरिकेतील California राज्यातील San Francisco येथील Northeastern University मधून पदव्युत्तर शिक्षणात ९८.६० टक्के गुणांसह डिस्टिंक्शन मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.अमन खान याचा पदवीदान समारंभ नुकताच अमेरिकेत उत्साहात संपन्न झाला. या समारंभास त्याचे कुटुंबीय व नातेवाईक उपस्थित होते. अमन खानच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार भीमराव केराम यांच्यासह शहर व परिसरातून अमन खान यांचे अभिनंदन करण्यात येत असून विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# कडा प्राथमिक आरोग्य केंद्रात २१ कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया यशस्वी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ग्रामीण भागातील माता-भगिनींना त्यांच्याच परिसरात, शहराच्या तोडीच्या सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, या हेतूने कडा प्राथमिक आरोग्य केंद्रात आयोजित करण्यात आलेले कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया शिबिर १०० टक्के यशस्वी ठरले आहे. शनिवार दि.२३ मे २०२६ रोजी या शिबिरात एकाच दिवशी तब्बल २१ महिलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या. शासकीय आरोग्य यंत्रणेने दाखवलेल्या या तत्परतेचे आणि उत्कृष्ट नियोजनाचे सध्या संपूर्ण कडा पंचक्रोशीतून कौतुक केले जात आहे. ग्रामीण भागात अनेकदा आरोग्याच्या पायाभूत सुविधांबद्दल साशंकता असते, मात्र योग्य नियोजन आणि प्रामाणिक इच्छाशक्ती असली की चित्र कसे बदलते,याचा उत्तम आदर्श कडा प्राथमिक आरोग्य केंद्राने प्रस्थापित केला आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेश तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली या




**तज्ज्ञ डॉक्टर्स यांच्या प्रयत्नाने ग्रामीण महिलांना मिळाला मोठा दिलासा**

शिबिराची अत्यंत सुयोग्य आखणी करण्यात आली होती. या मोहिमेसाठी बीड येथील अनुभवी शल्यचिकित्सक (सर्जन) डॉ. सुजित मसुरे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांचा प्रदीर्घ वैद्यकीय अनुभव आणि स्थानिक डॉक्टरांचे कौशल्य यांच्या सुरेख संगमातून या सर्व २१ शस्त्रक्रिया पार पडल्या. या संपूर्ण शिबिरात कडा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे-विधाते आणि डॉ. अमान बेग यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लाभार्थ्यांची पूर्वतपासणी, शस्त्रक्रिये दरम्यानची अचूकता आणि शस्त्रक्रियेनंतर रुग्णांची घ्यावयाची काळजी या सर्वच आघाड्यांवर या वैद्यकीय पथकाने उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली. कोणतीही मोठी आरोग्य मोहीम ही सांघिक प्रयत्नांशिवाय यशस्वी होत नाही, हे या शिबिराने पुन्हा एकदा सिद्ध केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व परिचारिका, आरोग्य सेवक आणि इतर कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या विशेष मेहनतीमुळेच हे शिबिर अत्यंत सुरळीतपणे पार पडले.

या मोहिमेत प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य निरीक्षक, आरोग्य सेवक आणि आरोग्य सेविका यांनी मोलाची साथ दिली. यामध्ये प्रामुख्याने बबन झगडे, आकाश फरांडे, एम. बी. दुनघव, आर. एम. काळे, बी. के. झगडे, श्रीमती एल. यु. आत्राम, श्रीमती एस. बी. गायकवाड, श्रीमती जे. सी. शेळके, श्रीमती एन. व्ही. मोरे, पी. टी. देसाई, श्रीमती ए. बी. धस, ए. एन. परकाळे, श्रीमती व्ही. एम. गुरसाळी, श्रीमती जे. आर. दातीर यांच्यासह विनायक धोंडे, सय्यद नदीम आणि आयुब यांची उपस्थिती व विशेष सहकार्य लाभले. या यशस्वी मोहिमेनंतर शल्यचिकित्सक व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सर्व कर्मचारी वृंदासमवेत समाधान व्यक्त केले. कडा आरोग्य केंद्राने राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमामुळे ग्रामीण महिलांची मोठी सोय झाली असून, सर्वत्र या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

# अर्धापूर नगरपंचायत मध्ये पत्रकार राजेश्वर देशमुख अमोल डढाळे याची स्विकृत नगरसेवक पदी निवड

## राजेश्वर देशमुख, अमोल डाढाळे झाले स्वीकृत नगरसेवक

अर्धापूर /प्रतिनिधी

अर्धापूर नगरपंचायतीच्या दोन स्वीकृत नगरसेवकांची निवड प्रक्रिया शुक्रवारी दि २२ मे रोजी पार पाडली आहे आहे. शहर विकास आघाडीचे राजेश्वर देशमुख, अमोल डाढाळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. ही निवड जाहीर होताच शहर विकास आघाडीच्या कार्यकत्यांनी फटाके वाजवून व गुलाल उधळून जल्लोष साजरा केला.

नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक सहा महिन्यांवर आली असतांना विधानपरिषद स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत दोन हाक्काचे मतं वाढविण्यासाठी शहर विकास आघाडीच्या नेत्यांनी स्वीकृत नगरसेवक निवड करण्यात आली आहे.

नगरपंचायतीच्या सभागृहात उपविभागीय अधिकारी डॉ सचिन खल्लाळ यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडली. त्यांना सहकार्य मुख्याधिकारी जगदीश दळवी यांनी केले. या विशेष सभेला शहर विकास आघाडीच्या नगराध्यक्षा सौ

वैशाली देशमुख, उपनगराध्यक्ष





मुक्तेदार खान पठाण, गटनेत्या शालीनी शेटे, नगरसेवक बाबुराव लंगडे, डॉ पल्लवी लंगडे, कान्होपात्रा माटे, छत्रपती कानोडे, सोनाजी सरोदे, मिनाक्षी राऊत, यासमीन सुलताना, नामदेव सरोदे, सलीम कुरेशी, सुमेरा बेगम हे नगरसेवक उपस्थित होते. शहर विकास आघाडीचे संख्याबळ तेरा असल्याने या आघाडीला दोन नगरसेवकांचा कोटा देण्यात आला. त्यामुळे शहर विकास आघाडीच्या गटनेत्यांनी नामनिर्देशीत वार्ड क्रमांक आठ मधील अमोल साहेबराव डढाळे

नगरसेवक निवड करण्यात आली

अर्धापुर शहर विकास आघाडीचे दोन स्वीकृत नगरसेवक निवडून येणार हे निश्चित होते. या दोन नगरसेवकांच्या निवडीचे सर्व अधिकार माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांना देण्यात आले होते.या स्वीकृत नगरसेवकपदासाठी इच्छीकांची संख्या खूप मोठी होती. माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांनी सर्वांना धक्कादेत स्वातंत्र्यसैनिक कुटुंबातील राजेश्वर देशमुख व कोणत्याही प्रकारची राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या एक सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील आमोल डढाळे यांना संधी दिली.व वार्ड क्रमांक नऊ मधील राजेश्वर लक्ष्मीकांत देशमुख यांची निवड झाल्याची घोषणा करण्यात आली.या निवडणुका प्रक्रियेनंतर नगरपंचायतीच्या सभागृहात नवनिर्वाचित नगरसेवकांचा छोटेखानी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते तसेच भारतीय जनता पक्षाचे सोशल मीडिया तालुका प्रमुखपदी गुरुराज रणखांब निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे तालुका प्रभारी किशोर स्वामी तालुकाध्यक्ष बालाजी गव्हाणे,

प्रवीण देशमुख, व्यंकटराव साखरे शहराध्यक्ष योगेश हाळदे, राजु शेटे, डॉ विशाल लंगडे, प्रल्हाद माटे प्रमोद मुळे, उमेश सरोदे, व्यंकटी राऊत, गाजी काजी, मुसवीर खतीब, नितीन डढाळे, दिलीप डढाळे, शिवराज डढाळे, प्रशांत खैरनार, शंकर ढगे, राजु पवार, शंकर करंडे, बाबुराव जाधव, मारोती माटे, गंगाधर राऊत, नितीन गोरे, नागोराव साबळे, बाबुराव जाधव.. बाळु माटे, गोपाल पंडित, राजु साबळे, शंकर डोलारकर व नगरपंचायत सर्व स्टॉप आदी उपस्थित होते.

# परळी वैजनाथ नगर परिषदेत घरगणना कार्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पथकाचा सत्कार



परळी (प्रतिनिधी) : भारतीय जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या घरगणनेच्या पहिल्या टप्प्यात परळी वैजनाथ नगर परिषदेमधील सर्कल क्रमांक ३४ च्या पर्यवेक्षक व प्रगणकांच्या पथकाने संपूर्ण काम सर्वप्रथम पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाबद्दल नगर परिषद कार्यालयात पथकाचा सत्कार करण्यात आला.

या पथकामध्ये पर्यवेक्षक सरताज ताहेरखान यांच्यासह प्रगणक ०१९९ फड संतोष, ०२०० हैदराबादे नितीन, ०२०१ नागरगोजे प्रवीण, ०२०२ शेख मसूद, ०२०३ पठाण फरहत बेगम आणि ०२०४ शेख मुस्ताक शेख पाशा यांचा समावेश होता. त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने व जबाबदारीने काम पूर्ण करून इतरांसमोर आदर्श निर्माण केला.

भारतीय जनगणना २०२७ च्या घरगणनेचा पहिला टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल आयोजित सत्कार समारंभात उपमुख्याधिकारी संतोष रोडे, जिल्हा जनगणना क्षेत्र प्रशिक्षक प्रा. शंकर कापसे, पंकज मधुकरराव दहातोंडे आणि वसीम अकबर शेख यांच्या उपस्थितीत पथकाचा पुष्पहार घालून व अभिनंदन करून गौरव करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी पथकाच्या कार्याचे कौतुक करत पुढील जनगणना कार्यही याच तत्परतेने आणि जबाबदारीने पूर्ण करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# अहिल्यानगरमध्ये खळबळजनक घटना; पोलीस मुख्यालयात हँडग्रेनेड हातातच फुटले, चार पोलीस जखमी

अहिल्यानगर । प्रतिनिधी

आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी सज्जता म्हणून घेतल्या जाणाऱ्या मॉक ड्रिल दरम्यान अहिल्यानगरमध्ये मोठी दुर्दैवी दुर्घटना घडली आहे. पोलीस मुख्यालयात प्रात्यक्षिके सुरू असताना अचानक हँड ग्रेनेडचा (हातबाँब) स्फोट झाला. या दुर्घटनेत चार प्रशिक्षणाथ पोलीस कर्मचारी जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे पोलीस दलासह संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

कोणतीही आणीबाणीची किंवा घातपाताची परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांचे रक्षण कसे करावे, गोंधळ न उडवता परिस्थिती कशी हाताळावी, याचे धडे देण्यासाठी पोलीस आणि अग्निशमन दलाच्या वतीने नियमितपणे मॉक ड्रिलफ अर्थात प्रात्यक्षिके आयोजित केली जातात. अहिल्यानगर पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सोमवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास अशाच एका मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले होते.

शस्त्रास्त्रे हाताळण्याचे प्रशिक्षण आणि माहिती देणे सुरू असतानाच, अचानक एका हँड ग्रेनेडचा जोरदार स्फोट झाला. हा स्फोट इतका अनपेक्षित होता की उपस्थित कर्मचाऱ्यांना सावरण्याची संधीच मिळाली नाही. या दुर्दैवी घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणाथ पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, स्फोट झाला तेव्हा ग्रेनेड अगदी जवळ असल्याने दोन कर्मचाऱ्यांच्या हाताची करंगळी तुटली आहे, तर इतर दोन कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत.

घटनेनंतर तातडीने धावपळ करून जखमी कर्मचाऱ्यांना शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले. सुदैवाने, सर्व जखमी कर्मचाऱ्यांची प्रकृती सध्या स्थिर असून त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत.

नेमकं काय घडलं?

मॉक ड्रिल हाताळण्याचे प्रशिक्षण सुरू असताना हॅन्ड ग्रेनाईड हातात फुटल्याने चार कर्मचारी जखमी झाले. पोलीस मुख्यालयातच ही घटना घडली. पोलीस कर्मचारी हातात हँड ग्रेनाईड



घेऊन माहिती देत होते. ही माहिती देत असतानाच अचानक हँड ग्रेनाईडचा स्फोट झाला. त्यामुळे एकच धावपळ उडाली. यात चारजण जखमी झाले. दोघे गंभीर जखमी झाल्याने त्यांना ताबडतोब उपचारासाठी खाजगी रुग्णालय दाखल करण्यात आले आहे. चौघांचीही प्रकृती ठिक असल्याचं सांगितलं जात आहे. पण दोघांची करंगळी तुटून पडली आहे.

दोन पोलीस कर्मचाऱ्यांची करंगळी तुटली

आमचा मॉक ड्रिलचा डेमो सुरू होता. आमच्या हातात ग्रेनाईड होते. ते कसे फोडायचे? काय करायचे? हे काहीच आम्हाला सांगितलं नव्हतं. ऑर्डर आल्यावर पिन ओढली आणि जागेवर हातात ब्लास्ट झाला. माझी करंगळी तुटली. डोळ्यात धूर गेला, असं जखमी पोलीस कर्मचाऱ्याने सांगितले. दुसऱ्या एका जखमी कर्मचाऱ्यानेही याची माहिती दिली. आमच्याकडे ग्रेनाईड होते. आम्हाला त्याची माहिती आम्हाला नव्हती. सूचना होत्या. पण संपूर्ण सूचना दिल्या नव्हत्या. या स्फोटात माझी करंगळी तुटून पडली आहे, असे या जखमी पोलीस कर्मचाऱ्याने सांगितले

# आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नांतून आष्टी तालुक्याला मिळणार अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका

## समाजसेवक समीर शेख यांच्या मागणीला यश






आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील गोरगरीब, शेतकरी, ऊसतोड मजूर, अपघातग्रस्त व प्रसूतीसाठी तातडीची वैद्यकीय मदत आवश्यक असलेल्या नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली असून लोकनेते, मराठवाडा भूषण आ. सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नांतून आष्टी तालुक्याला अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तालुक्यात वाढती लोकसंख्या, ग्रामीण भागातील आपत्कालीन परिस्थिती आणि सध्याच्या एकमेव रुग्णवाहिकेवरील ताण लक्षात घेता ही मागणी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने पुढे रेटली जात होती.

ओमप्रकाश शेटे साहेब, अध्यक्ष, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. २२ मे २०२६ रोजी दुपारी २ वाजता पंचायत समिती कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत या महत्त्वाच्या विषयावर चर्चा झाली. यावेळी आ. सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली समाजसेवक समीर शेख यांनी आष्टी तालुक्यासाठी अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका मंजूर करण्याची जोरदार मागणी केली.

समीर शेख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, आष्टी तालुक्यात सध्या केवळ एकच १०८ म्ब्युलन्स उपलब्ध असल्याने अनेक वेळा रुग्णांना वेळेत सेवा मिळण्यात अडचणी निर्माण होतात. विशेषतः दुर्गम भागातील रुग्ण, अपघातग्रस्त, गर्भवती महिला, ऊसतोड मजूर कुटुंबे आणि गरीब शेतकरी कुटुंबातील नागरिकांना रुग्णवाहिकेच्या प्रतीक्षेत राहावे लागते. अनेकदा आपत्कालीन परिस्थितीत विलंब झाल्याने गंभीर परिणाम होण्याची भीती निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.समाजसेवक समीर शेख यांनी स्वतःच्या सामाजिक कार्याचा उल्लेख करताना सांगितले की, त्यांनी आतापर्यंत ४८ अपघातग्रस्तांना तातडीची मदत केली असून १५ गरीब शेतकरी कुटुंबातील मुलींना प्रसूतीसाठी दवाखान्यात पोहोचवण्यास मदत केली आहे. मात्र तालुक्यात फक्त एकच रुग्णवाहिका उपलब्ध असल्यामुळे प्रशासन आणि सामाजिक कार्यकर्त्यांसमोर मोठा अडथळा निर्माण होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.यावेळी बोलताना समीर शेख म्हणाले की, अतिरिक्त रुग्णवाहिकेची मागणी आ. सुरेश आण्णा धस यांच्याकडे बराच काळ प्रलंबित होती. पत्रकार परिषदेत आ. धस आणि ओमप्रकाश शेटे यांनी या मागणीची गंभीर दखल घेत तातडीने रुग्णवाहिका मंजूर करण्याचे आश्वासन दिले आहे. विशेष म्हणजे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २२ जुलै रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त आष्टी तालुक्यास ही रुग्णवाहिका गिफ्ट स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले.आ. सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून तालुक्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असून, अतिरिक्त १०८ रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यास ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर उपचारासाठी दवाखान्यात पोहोचवणे शक्य होणार आहे. यामुळे अनेकांचे जीव वाचण्यास मदत होईल, असा विश्वास नागरिकांमध्ये व्यक्त केला जात आहे.समीर शेख यांनी रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हा संदेश देत सांगितले की, आष्टी तालुक्यातील गोरगरीब जनतेचा आरोग्यविषयक प्रश्न सोडवण्यासाठी आ. सुरेश आण्णा धस यांच्या प्रयत्नांतून ही मागणी निश्चितच मार्गी लागेल. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी सर्वप्रथम १०८ क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जर कोणत्याही कारणास्तव रुग्णवाहिका वेळेत उपलब्ध झाली नाही, तर समाजसेवक समीर शेख यांच्या मो. ७३५०१५३७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. आ. सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून तात्काळ मदत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही समीर शेख यांनी सांगितले.




# नीट पेपरफुटी प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने

## शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी :- डॉ .गणेश ढवळे

बीड : देशभर गाजत असलेल्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांच्या नेतृत्वाखाली बीडमधील विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील नागरिक व सुजाण बीडकरांच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिलाच पाहिजे एनपीए प्रशासन मुर्दाबाद, भ्रष्ट शिक्षण व्यवस्था मुर्दाबाद, पेपरफुटी करणा-यांची संपत्ती जप्त करा आदी जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात एनटीए संस्था बरखास्त करावी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा तसेच नीट पेपरफुटी प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.आंदोलनकर्त्यांनी पेपरफुटीच्या सूत्रधारांवर कठोर कारवाई करून त्यांची संपत्ती जप्त करण्यात यावी तसेच पेपरफुटीमुळे नैराश्यात जाऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणीही केली.

जिल्हाधिकारी बीड यांच्यामार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले.यावेळी आंदोलनात डॉ. गणेश ढवळे, शेख युनुस, रामनाथ खोड, मुबीन शेख,बाळासाहेब मोरे पाटील, किष्किंधा पांचाळ,सिताबाई भोसले,माजी सैनिक अशोक येडे,सय्यद सादेक, रामधन जमाले, शेख मुबीन, बाजीराव ढाकणे, प्राचार्य डी. जी. तांदळे, गणेश आजबे,नितिन जायभाये,राजु गायके,भिमराव कुंटे, कैलासचंद पालिवाल, रफीक पठाण, सुदाम तांदळे, शेख अमर, नितिन सोनावणे, कालिदास वनवे,आदी उपस्थित होते.डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पाहणारे लाखो विद्यार्थी रात्रंदिवस मेहनत घेत असताना कथित पेपरफुटी, निकालातील संशयास्पद बाबी आणि गैरव्यवहारामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ झाला आहे. शिक्षण व्यवस्थेचे वाढते बाजारीकरण आणि प्रशासनाचा निष्काळजीपणा यामुळे अशा घटना वारंवार घडत असल्याचा आरोप त्यांनी केला.एनटीए संस्थेने विश्वासार्हता गमावली असून ती तात्काळ बरखास्त करावी, दोषींवर कठोर कारवाई करून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी पारदर्शक व सुरक्षित परीक्षा प्रणाली लागू करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# माजी सभापती स्व.केशवराव गर्जे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भावपूर्ण अभिवादन

## कीर्तन,श्रद्धांजली संपन्न ;मान्यवरांची मोठी उपस्थिती

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी पंचायत समितीचे माजी सभापती तथा जनसामान्यांच्या मनात बापू आणि चाचा या नावांनी विशेष स्थान निर्माण करणारे स्वर्गीय केशवराव ऊर्फ बापूराव रामराव गर्जे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आष्टी येथील विनायकनगर परिसरात धार्मिक, सामाजिक आणि श्रद्धांजलीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी ह.भ.प. महंत काशिनाथ महाराज नागतळा यांच्या सुश्राव्य कीर्तनाने वातावरण भक्तिमय झाले, तर आयोजित श्रद्धांजली सभेत विविध मान्यवरांनी स्व. बापूराव गर्जे यांच्या कार्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा भावपूर्ण शब्दांत गौरव करत त्यांना आदरांजली वाहिली.

या प्रसंगी दैनिक झुंजारनेताचे वरिष्ठ उपसंपादक उत्तम बोडखे यांनी बोलताना स्व. बापूराव गर्जे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडले. ते म्हणाले की, माजी सभापती बापूराव गर्जे यांनी आयुष्यभर त्याग, कष्ट आणि प्रामाणिकपणाची जीवनमूल्ये जपली. ते शांत, सुस्वभावी, मित्र जोडणारे आणि समाजातील प्रत्येक घटकाशी आत्मीयतेने वागणारे व्यक्तिमत्त्व होते. आपल्या प्रचंड जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी समाजकारण व राजकारणात वेगळा ठसा उमटवला. उत्तम बोडखे यांनी आपल्या भाषणात स्व. बापूराव गर्जे यांच्या अनेक आठवणींना उजाळा देताना सांगितले की, कर्म सेवामय झाले की जीवन सुगंधित होते, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. नम्रता हा जीवन सुधारण्याचा मार्ग आहे असे ते नेहमी सांगत असत. तरुणांमध्ये तरुणांसारखे आणि ज्येष्ठांमध्ये ज्येष्ठांसारखे मिसळून



राहणारे ते एक उत्तम मित्र, मार्गदर्शक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. जसे श्वास घेऊन जगतो, तसे ध्यास घेऊन जगा हा त्यांचा विचार आजही आष्टी तालुक्यातील समाजकारण आणि राजकारणाला दिशा देणारा आहे. सत्याची कास धरून कष्टाची उपासना करावी, हा त्यांचा संदेश समाजासाठी प्रेरणादायी ठरला. जग बदलण्यापूर्वी स्वतःमध्ये बदल घडवून आणण्याची शिकवण देणाऱ्या स्व. बापूराव गर्जे यांच्या कार्यातून चांगुलपणाची मूल्ये पुढील पिढीत रुजतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर, बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. शिवाजी राऊत, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, भाऊसाहेब लटपटे, दिनकरराव तांदळे महाराज, एन. टी. गर्जे, ड. हनुमंत थोरवे, अमोलराजे तरटे, विठ्ठलराव बनसोडे, दिलीपराव काळे, अशोक साळवे, ह.भ.प. अशोक महाराज काकडे, कल्याण काकडे, ह.भ.प. प्रा. विजय राजपुरे महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे, डॉ. युवराज तरटे, छगन तरटे, डॉ. डी. बी. राऊत, अशोक गर्जे, सुंदरलाल गर्जे, ड. रत्नदीप निकाळजे, सेवानिवृत्त तहसीलदार शहादेव गिते, आश्रुबा खलाटे, सरपंच शिवाजीराजे गर्जे, सरपंच दत्तात्रय खोटे, रामदास सोनवणे (फौजी), कृष्णा मिसाळ, गोरे सर, हरी बोडखे, के. बी. खाडे, जी. आर. बोराटे, जालिंदर पोकळे, सदाशिव दिंडे, लांबडे मामा, सरपंच संजय मिसाळ, सरपंच विष्णू दहिफळे, राजू गोल्हार, बिभिषन साळुंके, अशोक सोनवणे, वैभव गर्जे, एम. डी. लटपटे, संदिप गर्जे, पी. के. सर, सोमनाथ भोसले, पत्रकार समिर शेख, राजेंद्र लाड, संदिप वायभासे, डॉ. राम तरटे, सुरेश विधाते, रघुनाथ गोल्हार, बाळासाहेब वनवे, विठ्ठल गर्जे, आजिनाथ शेकडे यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रद्धांजली सभेत माजी आ. भीमराव धोंडे, माजी आ. साहेबराव दरेकर, सरपंच शिवाजीराजे गर्जे, कृष्णा मिसाळ, यशवंत खंडागळे, रामदास सोनवणे, आश्रुबा खलाटे, डॉ. युवराज तरटे, अमोलराजे तरटे, अशोक गर्जे, डॉ. डी. बी. राऊत, ड. रत्नदीप निकाळजे, भाऊसाहेब लटपटे, दिलीपराव काळे, ड. हनुमंत थोरवे आणि ह.भ.प. दिनकरराव तांदळे महाराज यांच्यासह अनेकांनी स्व. बापूराव गर्जे यांच्या आयुष्यातील विविध प्रसंग, त्यांच्या नेतृत्वगुणांची वैशिष्ट्ये आणि समाजहितासाठी केलेल्या कार्याची आठवण सांगत आदरांजली वाहिली. स्व. केशवराव ऊर्फ बापूराव रामराव गर्जे यांनी आपल्या जिद्द, मेहनत, आत्मविश्वास आणि लोकाभिमुख स्वभावाच्या बळावर जनसामान्यांच्या मनात सन्मानाचे अढळ स्थान निर्माण केले होते. बापू आणि चाचा या नावांनी प्रेमाने ओळखले जाणारे हे व्यक्तिमत्त्व हजारो लोकांच्या मायेचे केंद्रबिंदू बनले होते. त्यांच्या लोकप्रियतेची खरी ताकद ही पदात नव्हे, तर लोकांच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासात होती. लोकांचे प्रेम, स्नेह आणि आशीर्वाद हीच त्यांच्या आयुष्याची खरी संपत्ती ठरली, अशी भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.



# मराठीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. रघुनाथराव शेळके महाराज यांना आष्टीत भावपूर्ण आदरांजली

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मराठी साहित्याचे आणि भाषेचे गाढे अभ्यासक तसेच अध्यात्मिक क्षेत्रातील एक आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणजे कै. ह.भ.प. रघुनाथराव शेळके महाराज. त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त आष्टी येथे नुकताच एक कृतज्ञतापर कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याला परिसरातील अनेक संत-महंत, कीर्तनकार आणि सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून कै. शेळके महाराज यांच्या स्मृतींना विनम्र आदरांजली अर्पण केली. आष्टी शहरातील सुप्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ. संतोष शेळके यांचे ते वडील होते.

ह.भ.प. रघुनाथराव शेळके महाराज यांनी आपले संपूर्ण आयुष्य मराठी भाषेची सेवा आणि परमार्थासाठी वेचले. त्यांच्या या निस्वार्थ सेवेचे आणि ज्ञानदानाचे स्मरण या प्रथम पुण्यतिथीच्या निमित्ताने सर्वांनी केले. या भावपूर्ण सोहळ्याला अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गजांची उपस्थिती होती. सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज, लाला महाराज राक्षे, रवींद्र महाराज तवले, नानासाहेब महाराज तवले,बाळासाहेब महाराज झगडे, नानासाहेब भोगाडे महाराज या सर्व संत-महंतांनी उपस्थित राहून महाराजांच्या पारमार्थिक कार्याचा गौरव केला व त्यांना भक्तीपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

या सोहळ्याला लोकनेते आ. सुरेश आण्णा धस, मा. जिल्हा परिषद सदस्य सतिष आबा शिंदे यांच्यासह राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, व्यापारी, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रातील मान्यवरांनीही आवर्जून हजेरी लावली. यामध्ये ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे आणि पत्रकार शरद रेडेकर, राजेंद्र लाड यांनीही उपस्थित राहून शेळके कुटुंबाप्रती आपल्या संवेदना व्यक्त केल्या आणि महाराजांच्या आठवणींना उजाळा दिला. उपस्थित सर्व मान्यवरांनी कै. रघुनाथराव शेळके महाराजांच्या ज्ञानाबद्दल आणि त्यांच्या साध्या सरळ जीवन शैलीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी डॉ. संतोष शेळके आणि समस्त शेळके परिवाराने सोहळ्याला उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवरांचे आणि ग्रामस्थांचे आभार मानले.